
पेजिनेशनसाठी
अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
CorelDRAW Ps Ai Id
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25

काजळे ज्वेलर्स
Diamond Jewellery Launching
(Coming Soon)
Vacancy for
4 Sales Officers
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर
मो. 9601222777, 9615222777

वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक १०६ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) रविवार । ०३/०५/२०२६ । पाने - ६




# आ. सत्यजीत तांबे यांच्या नेतृत्वाने संगमनेरचा विकास आराखडा वेगात

## संगमनेर 2.0 कडे वाटचाल, 100 दिवसांत 105 निर्णय

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर-महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात व माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर नगर परिषदेने अत्यंत चांगले काम केले आहे. संगमनेर शहरातील जनतेने दाखवलेला विश्वास सार्थ ठरवून पुढील वीस वर्षांचे नियोजन ठेवून आधुनिकता आणत संगमनेर शहराच्या शाश्वत विकासासाठी आपण कटिबद्ध असल्याचे आमदार सत्यजित तांबे यांनी म्हटले असून नगरपालिकेच्या पहिल्या शंभर दिवसातील महत्त्वपूर्ण पायाभूत ठळक कामे करून विविध कामांचा लेखाजोखा त्यांनी मांडला आहे.




संगमनेर नगरपालिकेच्या नवीन पदाधिकाऱ्यांनी ३ जानेवारी २०२६ ला पदभार घेतल्यानंतर पहिल्या शंभर दिवसांच्या कामकाजाचा आढावा आमदार सत्यजित तांबे यांनी पत्रकार परिषदेमध्ये सादर केला यावेळी माजी नगराध्यक्षा सदुर्गाताई तांबे, नगराध्यक्ष सौ. डॉ मैथिलीताई तांबे, उपनगराध्यक्ष नूर मोहम्मद शेख, माजी नगराध्यक्ष दिलीपराव पुंड, विश्वासराव मुर्तडक, नगरसेवक सीमाताई खटाटे, भारत बोऱ्हाडे, अर्चना दिघे, सौरभ कासार, शोभाताई पवार, प्राची काशीद, किशोर पवार, अनुराधा सातपुते, वनिता गाडे, गजेंद्र अभंग, मालती डाके, नितीन अभंग, दिपाली पांचारीया, गणेश गुंजाळ, अमजद पठाण, श्रीमती विजया गुंजाळ, शेख शकीला, सरोजना पगडाल, डॉ. दानिश पठाण, किशोर टोकसे, प्रियांका शहा, शैलेश कलंत्री, नंदा गरुडकर, मुजीब खान पठाण, सोमेश्वर दिवटे, रचना मालपाणी, जावेदखान पठाण आदी मान्यवर उपस्थित होते.

पत्रकार परिषदेत पहिल्या शंभर दिवसांच्या कामकाजाची माहिती देताना आमदार तांबे म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात व माजी आ. डॉक्टर सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपालिकेने १९९१ पासून नागरिकांना अत्यंत चांगल्या सुविधा दिल्या आहेत. झालेल्या निवडणुकीमध्ये संगमनेर २.० यासाठी जनतेचा जाहीरनामा केला आणि तो पूर्ण करण्यासाठी आपण काम करत आहोत. शहरातील नागरिकांनी मोठा विश्वास दाखवला असून ३० पैकी २७ नगरसेवक व राज्यातून सर्वाधिक मताधिक्याने नगराध्यक्ष निवडून आले आहेत. हा जनतेचा विश्वास असून आपण तो सार्थ ठरवणार आहोत. पहिले शंभर दिवस हे पायाभरणीचे ठरले आहेत

मागील चार वर्षापासून नगरपालिकेमध्ये प्रशासन असल्याने प्रशासकीय कामात मोठ्या अडचणी होत्या विकास कामे ठप्प झालेली होती. अरेरावी, बेशिस्तपणा, अतिक्रमणे यांच्यामध्ये मोठी वाढ झाली होती. विकास कामांना खीळ बसली होती. नवीन पदाधिकाऱ्यांनी कारभार हातात घेतल्यानंतर अवघे तीन ते चार लाख रुपये शिल्लक होते.

अशा अडचणीच्या परिस्थितीत विभाग वाईज ३९ बैठका घेऊन प्रशासकीय कामाला गती दिली यामध्ये प्रामुख्याने महिलांसाठी सुरक्षा रक्षक दल निर्माण केले जे राज्यासाठी दिशादर्शक ठरले आहे कायद्यास व्यवस्थामध्ये मदत करत आहेत. फ्लेक्समुक्त शहरासाठी काम सुरू आहे मात्र काही जण लावतात त्यांच्यावरही कारवाई होईल तक्रार ॲप निर्माण झाला असून मागील तीन महिन्यात ३१७ तक्रारींचे निवारण करण्यात आले आहे याचबरोबर नगराध्यक्ष वारू केली असून त्यामधून प्रशासकीय कामाला गती मिळाली आहे महिलांसाठी दहा इ टॉयलेट देण्यात आले आहेत शहरांमध्ये पूर्ण दाबाने (पान २)

### 100 दिवसातील ठळक विकास कामे

महिलांच्या सुरक्षे करता सुरक्षारक्षक दल, फ्लेक्समुक्त शहरासाठी ९९% अंमलबजावणी, तक्रार ॲप कार्यान्वित, कायदा सुव्यवस्थेला प्राधान्य, महिलांसाठी १० इ. टॉयलेट, शहरात उन्हाळ्यातही स्वच्छ व पूर्ण दाबाने मुबलक पाणी, दोन विभागीय क्षेत्रीय कार्यालय, धुळमुक्त शहरासाठी दोन गाड्यांची नवीन मंजुरी, कचरा व्यवस्थापनासाठी दीर्घकालीन आराखडा याचबरोबर प्रस्तावित सोमेश्वर कॉरिडोर यांसह विविध विकासकामे मार्गी लागणार आहेत.

### संगमनेरात दिव्यांग व पत्रकार भवन

शहरातील पत्रकार, दिव्यांग व महिलांसाठी स्वतंत्र कार्यालय असावे अशी अनेक वर्षांपासूनची मागणी आहे. या मागणीची दखल घेत लवकरच शहरातील नविन नगररोड परिसरात तीन मजली इमारत बांधण्यात येणार आहे. यात खाली दिव्यांग भवन, दुसरा मजला महिला भवन व वरती पत्रकार भवन असे स्वतंत्र भवन उभारण्यात येणार आहे.

### संगमनेरात 'मॉडेल रोड'ची संकल्पना

शहरांमध्ये विविध महापुरुषांचे पूर्णाकृती पुतळे बसून बस स्थानक ते छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा हा परिसर अत्यंत सुंदर बनवण्यात येणार असून जाणता राजा ते राजपाल हा मॉडेल रोड तयार करण्यात येणार आहे. याचबरोबर अतिक्रमण काढून शहरात नव्याने तयार होणारे सर्व रस्ते हे उच्च गुणवत्तेचे असतील यासाठी नगरपालिका काम करेल असा विश्वास आमदार सत्यजित तांबे यांनी व्यक्त केला.

# संघर्षातून घडलेला महाराष्ट्र विकासाच्या वाटेवर

## महाराष्ट्र दिनानिमित्त आ.अमोल खताळ यांच्या हस्ते ध्वजारोहण




संगमनेर तालुका आर्थिक विकास, रोजगारनिर्मिती, उद्योग, शेती आणि पायाभूत सुविधांच्या बाबतीत अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. महाराष्ट्राच्या विकासात संगमनेर तालुक्याचा खूप मोठा वाटा राहावा, तसेच रोजगार व आर्थिक प्रगतीच्या बाबतीत तालुका परिपूर्ण व्हावा यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील.

**आ. अमोल खताळ**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महाराष्ट्र राज्याच्या जडणघडणीत अनेक हुतात्म्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले असून संघर्षातून महाराष्ट्राची निर्मिती झाली आहे. छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर संभाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर महाराष्ट्र उभा राहिला असून त्यांच्या कार्यामुळे राज्याला प्रगतीची दिशा मिळाली असल्याचे गौरवोद्गार आमदार अमोल खताळ यांनी काढले

महाराष्ट्र दिनानिमित्त क्रीडासंकुलनामध्ये आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संगमनेर उपविभागाचे उपविभागीय अधिकारी अरुण उंडे, तहसीलदार धीरज मांजरे, संगमनेर उपविभागाचे पोलीस उपाधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे, मुख्याधिकारी दयानंद गोरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीनिवास वप, तालुका कृषीअधिकारी रेजा बोडके, पंचायतसमिती सहाय्यक गटविकास अधिकारी राजेंद्र ठाकूर, नायब तहसीलदार संदीप भांगरे, गणेश अढारी, मिलिंद माळवे, भाजप राज्य कार्यकारणी सदस्य दादाभाऊ गुंजाळ, भाजपचे शहराध्यक्ष पायल ताजणे, शिवसेना शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी, आरपीआयचे शहरध्यक्ष कैलास कासार, शशांक नामन यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

आ. खताळ म्हणाले की, महाराष्ट्र आर्थिक, औद्योगिक, शेती व कामगार क्षेत्रामध्ये देशात अग्रस्थानी काम करत आहे. शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांच्या विकासासाठी राज्य सरकार विविध योजना राबवत असून राज्याची विकासाची वाटचाल अधिक वेगाने सुरू आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र सर्व क्षेत्रात प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहे महायुती सरकार च्या मार्गदर्शनाखाली काम करताना महाराष्ट्राच्या विकासात योगदान देण्याची संधी मिळत असल्याचा आनंद आहे. महाराष्ट्र निर्मितीसाठी झालेल्या संघर्षातून राज्याच्या विकासाचे जे स्वप्न पाहिले गेले होते, त्या दिशेने राज्याची वाटचाल सुरू आहे.

# संगमनेरात शाही विवाहाचा जल्लोष

## मान्यवरांची मांदियाळी, भव्यतेचा नवा उच्चांक



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -संगमनेर नगरीत रविवारी (दि. ३ मे) एका दिमाखदार आणि भव्य विवाह सोहळ्याचे साक्षीदार होण्याचा योग येत आहे. महाराष्ट्रातील ख्यातनाम समाजप्रबोधनकार व कीर्तनकार ह. भ. प. निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांची कन्या ज्ञानेश्वरी आणि सुप्रसिद्ध उद्योजक सुनील चिलप यांचे चिरंजीव साहिल यांचा शाही विवाह सोहळा मोठ्या थाटामाटात पार पडणार आहे.

या विवाह सोहळ्याला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मंत्रिमंडळातील अनेक मंत्री, विविध धर्मपीठांचे धर्माचार्य, तसेच आध्यात्मिक, सामाजिक, राजकीय आणि व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवरांची भव्य उपस्थिती लाभणार आहे. त्यामुळे हा सोहळा केवळ विवाह न राहता एक भव्य सामाजिक सोहळा ठरणार आहे.

शहराजवळील गुंजाळवाडी व राजापूर परिसरात तब्बल दहा एकर क्षेत्रावर उभारण्यात आलेले भव्य मंडप आणि सजावट सर्वांचे लक्ष वेधून घेत आहेत. वधू-वरांसाठी आकर्षक मुख्य स्टेज, मान्यवरांसाठी खास व्हीआयपी व्यवस्था, हजारो नागरिकांसाठी प्रशस्त आसनव्यवस्था, नेत्रदीपक रोषणाई, भव्य स्वागत कमानी आणि स्वतंत्र भोजन व पार्किंग व्यवस्था यामुळे परिसराला जणू एखाद्या उत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. विशेष म्हणजे, या सोहळ्यासाठी एक लाखांहून अधिक पाहुण्यांची उपस्थिती अपेक्षित असल्याने संपूर्ण संगमनेर शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रशासनाकडून कडक सुरक्षा आणि सुयोग्य वाहतूक व्यवस्थेची आखणी करण्यात येत आहे.

संगमनेर तालुक्यात अनेक वर्षांनंतर प्रथमच असा भव्य आणि शाही विवाह सोहळा पार पडत असून, या सोहळ्याची चर्चा सध्या जिल्ह्यासह राज्यभर रंगली आहे.









# गॅस दरवाढीचा हॉटेल उद्योगाला फटका



मुंबई (वृत्तसंस्था)

मध्य पूर्वेत सुरू असलेल्या तणावामुळे विस्कळीत झालेला पुरवठा आणि आता कमर्शियल एलपीजी सिलेंडरच्या किमतीत झालेली मोठी वाढ यामुळे हॉटेल आणि रेस्टॉरंट उद्योग संकटात सापडला आहे. कमर्शियल एलपीजीच्या किमतीतील या ताज्या वाढीमुळे हॉटेल उद्योगाला 'गंभीर झटका' बसला असून पुढील काळात परिस्थिती अधिक बिघडण्याची भीती निर्माण झाली आहे. उद्योग संघटनांनी सरकारनं तातडीनं हस्तक्षेप करून ही दरवाढ मागे घेण्याची मागणी केली आहे. १ मे २०२६ पासून कमर्शियल एलपीजीच्या किमतीत ९९३ रुपयांची वाढ करण्यात आली असून, आता १९ किलोच्या सिलेंडरचा दर विक्रमी ३,०७१.५० रुपये झाला आहे. यापूर्वीही वाढवण्यात आलेले दरयापूर्वी एप्रिलमध्ये कमर्शियल एलपीजीच्या किमती १९५.५० रुपयांनी आणि मार्चमध्ये १४४ रुपयांनी वाढवण्यात आल्या होत्या. फेडरेशन ऑफ हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ इंडियाचेउपाध्यक्ष प्रदीप शेट्टी यांनी, एलपीजीच्या किमतीत झालेल्या वाढीमुळे जेवणाच्या दरात १० ते १५ टक्क्यांपर्यंत वाढ होणं जवळपास निश्चित असल्याचं म्हटलं. परंतु ही दरवाढदेखील वाढलेल्या खर्चाची पूर्ण भरपाई करू शकणार नाही, असंही ते म्हणाले. १९ किलोच्या सिलिंडरमध्ये तीन वेळा मिळून झालेल्या एकूण १,३३२.५० रुपयांच्या दरवाढीमुळे उद्योगाचा परिचालन खर्च अभूतपूर्व पातळीवर पोहोचला आहे. हे संकट अशा वेळी आलंय जेव्हा व्यवसाय आधीच पुरवठ्यातील व्यत्यय, मर्यादित परिचालन क्षमता आणि कमकुवत रोख प्रवाह यांसारख्या आव्हानांचा सामना करत आहेत.'मार्जिनवर येऊ शकतो दबाव'प्रदीप शेट्टी यांच्या मते अनेक हॉटेल आणि रेस्टॉरंट आधीच मर्यादित वेळ, मर्यादित मेन्यू आणि पर्यायी इंधन व्यवस्थेसह काम करत आहेत. अशा परिस्थितीत, ९९३ रुपयांच्या या वाढीमुळे त्यांच्या मार्जिनवर दबाव येईल आणि कामकाजावर त्याचा परिणाम होईल. त्यांनी असा इशारा दिला आहे की अनेक हॉटेल-रेस्टॉरंट आधीच तात्पुरत्या स्वरूपात बंद झाली असून किमतीतील ही नवीन वाढ हॉटेल-रेस्टॉरंट बंद होणं आणि रोजगार कपातीला अधिक वेग देऊ शकते.

# सिंहस्थपूर्वी मोठा निर्णय; शिर्डी मार्गासाठी 213 कोटींचा निधी मंजूर

मुंबई, ठाणे, नाशिक आणि गुजरात येथील साई भक्ताना शिर्डीला जाण्यास सर्वात जवळचा ठरणारा सायाळे, जवळके मार्गे रस्त्यासाठी तसेच ओझर ते शिर्डी विमानतळासाठी वेगवान ठरणाऱ्या १० मीटर रुंद मार्गासाठी सरकारने आगामी सिंहस्थ पर्वणीतून २१३.५७ कोटी रुपयांची आर्थिक तरतूद केली असल्याची माहिती हाती आली आहे. त्यामुळे जवळके जनमंगल ग्रामविकास संस्थेसह सायाळे, बहादरपूर, वेस, धोंडेवाडी, दुर्शिंगपूर, डोऱ्हाळे, काकडी, मल्हारवाडी आदी गावातील ग्रामस्थानी समाधान व्यक्त केले आहे.

जवळके मार्गे मुंबई, ठाणे, कल्याण, नाशिक, गुजरात येथून शिर्डीला येणाऱ्या साईभक्ताना हा सर्वात जवळचा ठरत आला आहे. आगामी वर्षात नाशिक येथे संपन्न होणाऱ्या सिंहस्थ काळात राज्य व केंद्र सरकारने नजिकचे तीर्थक्षेत्र आणि देवस्थाने जोडण्यासाठी जवळपास ३० हजार कोटी रुपयांची आर्थिक तरतूद केली आहे. तर शिर्डीसाठी नांदुर, निमोण, तळेगाव दिघे, लोहारे, निर्मळ पिंपरी मार्गे शिर्डीसाठी आर्थिक तरतुद केली होती. मात्र शिर्डीसाठी सर्वात जवळचा ठरणारा व दुष्काळी बंगला वरदान ठरणारा हा मार्ग वळगला होता. पूर्वी हा मार्ग जिल्हा परिषदेकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यासाठी १९९५ साली जनमंगल ग्रामविकास संस्थेच्या कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले होते. तत्कालीन युती सरकारमधील सार्वजनिक बांधकाम राज्य मंत्री स्व.अशोकराव डोणगावकर यांचे सहकार्याने जवळके येथील जनमंगल ग्रामविकास संस्थेच्या माध्यमातून प्रयत्न केले होते. आणि त्याला यश आले होते. त्यानंतर हा रस्ता डांबरीकरण होऊ लागला होता. त्यानंतर हा या रस्त्यावरून शिर्डीसाठी जाणाऱ्या पालख्या आणि प्रवासी वाहने सर्वाधिक संख्येने जात असतानाही शिर्डी येथील साईबाबा संस्थानकडे जनमंगल ग्रामविकास संस्थेने पाठपुरावा करूनही त्याकडे दुर्लक्ष केले होते. सन-२०१५-१६ साली माजी खा. भाऊसाहेब वाकचौरे यांचे सहकार्याने केंद्रीय रस्तेविकास मंत्री नितीन गडकरी यांचे




माध्यमातून संस्थेने दहा कोटी रुपयांचा निधी आणला होता. त्यामुळे हा रस्ता दुपदरी झाला होता. मात्र सिंहस्थ पर्वणीतून या रस्त्यासाठी मात्र एक फुकटी कवडीची तरतूद झाली नव्हती. त्यामुळे दुष्काळी भागातील ग्रामस्थानी संताप व्यक्त केला होता. या रस्त्यानजिक असलेल्या ग्रामपंचायतींनी आपल्या ग्रामसभांचे ठराव घेऊन सरकारकडे या रस्त्यासाठी निधीची मागणी केली होती.सामाजिक कार्यकर्त्यांनी याबाबत लोकप्रतिनिधींचे वारंवार लक्ष वेधून घेऊनही उपयोग झाला नव्हता.त्याबाबत वृत्तपत्रात आणि सामाजिक माध्यमांत अनेक वेळा टीका करण्यात आली होती.अखेर या लढयाला यश आले असून यासाठी सरकारने हा मार्ग ओझर विमानतळ ते शिर्डी विमानतळ या मार्गात ८५.५० किमीचा रस्ता समाविष्ट करून त्यासाठी २१३.५७ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.याबाबतचे वृत्त नुकतेच प्रसिद्ध झाले आहे.

दरम्यान हा रस्ता वर्तमानात ५.५० मीटर रुंदीचा असून तो आता तब्बल १० मीटर रुंदीचा होणार आहे.त्यामुळे ओझर विमानतळ ते शिर्डी काकडी विमानतळ या मार्गाने प्रवाशांना केवळ दोन तासात पोहचता येणार आहे.जुन्या रस्त्यांना त्यासाठी तब्बल तीन तास वेळ खर्ची पडत होता.या निधीसाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,जलसंपदा मंत्री गिरीश महाजन,सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले आदींचे आभार मानले आहे.

दरम्यान या निधीमुळे कोपरगाव तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते नानासाहेब जवरे, एस. के. थोरात,निळवंडे कालवा कृती समितीचे कार्यकर्ते गंगाधर रहाणे, उपाध्यक्ष संजय गुंजाळ, विलास डांगे, बहादरपूरचे सरपंच गोपीनाथ रहाणे, बाबासाहेब गव्हाणे, भाऊसाहेब गव्हाणे, रंगनाथ गव्हाणे, माजी सरपंच माणिक दिघे, तानाजी शिंदे, सरपंच सारिका विजय थोरात, राजेंद्र नेहे, माजी सरपंच वसंत थोरात, डी. के. थोरात, नवनाथ शिंदे, गोरक्षनाथ शिंदे, दत्तात्रय थोरात, रखमा वाकचौरे, एकनाथ थोरात, विठ्ठल थोरात, ग्रामपंचायत सदस्य भाऊसाहेब थोरात,चंद्रकांत थोरात आदींनी स्वागत केले आहे.

# गुप्तवार्ता अधिकारी विशाल मेंद्रे यांचा राज्यस्तरीय सन्मान

युवावार्ता(प्रतिनिधी)

संगमनेर - महाराष्ट्र राज्य पोलीस दलात आपल्या कर्तव्याचा ठसा उमटविणाऱ्या अधिकाऱ्यांचा सन्मान करण्याची परंपरा यंदाही दिमाखात पार पडली. राज्य गुप्तवार्ता विभागात कार्यरत असलेले गुप्तवार्ता अधिकारी विशाल मेंद्रे यांना त्यांच्या उत्कृष्ट सेवा आणि समर्पित कर्तव्यनिष्ठेबद्दल राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्या हस्ते 'पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र' देऊन गौरवण्यात आले. मुंबईतील पोलीस मुख्यालयात पार पडलेल्या विशेष सोहळ्यात त्यांना सन्मान प्रदान करण्यात आला.

सन २०२४ च्या पुरस्कारांसाठी राज्य गुप्तवार्ता विभागातील एकूण २२ अधिकार्यांची निवड करण्यात आली होती. यामध्ये विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, नाशिक विभागांतर्गत येणार्या नाशिक, अहिल्यानगर, धुळे, जळगाव आणि नंदुरबार या पाच जिल्ह्यांतून केवळ दोनच अधिकार्यांना हा बहुमान मिळाला आहे. त्यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातून विशाल मेंद्रे हे एकमेव अधिकारी ठरले आहेत. पोलीस दलातील कठीण आव्हाने पेलत असताना त्यांनी दाखवलेली कार्यतत्परता आणि गोपनीय माहिती संकलनातील त्यांचे कौशल्य या पुरस्काराच्या



रुपाने अधोरेखित झाले आहे.

विशाल मेंद्रे यांनी महाराष्ट्र पोलीस दलात आतापर्यंत २३ वर्षे प्रदीर्घ सेवा बजावली आहे. या काळात त्यांनी अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलातील विविध पोलीस ठाणी आणि शाखांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. सध्या ते राज्य गुप्तवार्ता विभागात कार्यरत असून, राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील असलेल्या या विभागात त्यांनी दिलेले योगदान मोलाचे आहे.

मुंबईत पार पडलेल्या या गौरव सोहळ्याप्रसंगी राज्य गुप्तवार्ता विभागाचे आयुक्त शिरीष जैन, सहआयुक्त रवींद्र शिसवे यांसह विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पोलीस महासंचालकांनी यावेळी उपस्थित अधिकार्यांना मार्गदर्शन करताना राज्यातील परिस्थिती आणि भविष्यातील आव्हाने यावर भाष्य केले. मेंद्रे यांना मिळालेल्या या पुरस्कारामुळे त्यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# किरण घोटेकर यांचे निधन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरातील जनता नगर येथील रहिवासी व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवा नेते व सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग असलेले किरण घोटेकर यांचे एक मे महाराष्ट्र दिनी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांचे आकस्मित निधन अनेकांच्या मनाला चटका लावून गेले.

किरण घोटेकर यांच्यावर सायंकाळी येथील अमरधाममध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. किरण घोटेकर राजकारण , समाजकारणात सक्रिय असल्याने



मोठा मित्र परिवार त्यांनी जोडला होता. त्यामुळेच त्यांच्या आकस्मित निधनाने शहरात मोठ्या प्रमाणात हळहळ व्यक्त केली जात आहे.अनेक मान्यवरांनी त्यांच्या कार्याचा उल्लेख करत समाजकारणात एक कार्यतत्पर, प्रामाणिक आणि जिवाभावाचा माणूस आपण गमावला आहे, अशा भावना व्यक्त केल्या. युवकांसाठी मार्गदर्शक ठरलेले किरण घोटेकर यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी सहज भरून न निघणारी असल्याचेही बोलले जात आहे.

किरण घोटेकर यांच्या पश्चात कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार आणि असंख्य चाहत्यांचा मोठा परिवार आहे. त्यांच्या आठवणी आणि त्यांनी केलेले सामाजिक कार्य हेच त्यांच्या जीवनाचे खरे स्मारक ठरणार आहे.

दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने कै. किरण घोटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

# आ. सत्यजीत तांबे यांच्या नेतृत्वाने संगमनेरचा...

१ वरून - सुरळीतपाणीपुरवठा होत आहेत सध्या ४२ओल तापमानामध्ये सुद्धा सर्व नागरिकांना चांगले पाणी मिळत आहेत धूळ मुक्त शहरासाठी दोन गाड्या नवीन मंजूर करून घेतल्या आहेत तसेच कचरा व्यवस्थापनासाठी दीर्घकालीन आराखडा आखण्यात आला आहे.

याचबरोबर चार सर्वसाधारण सभेमधून १०५ निर्णय घेण्यात आले असून हायटेक बस स्थानकात मध्यवर्ती ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे त्यांचा पूर्णकृती पुतळा, संविधान भिंत, शहीद स्मारक, शंभर फूट तिरंगा, महात्मा फुले सावित्रीबाई फुले यांचे पूर्ण कृती पुतळे याचबरोबर यंग नॅशनल ग्राउंड व गंगामाई घाटावर हेल्थ क्लब अशा विविध कामांना मंजुरी देण्यात आली आहे. सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येणार असून शहरातील २००० नागरिकांना घरे देण्याची प्रक्रिया सुरू आहे अतिक्रमण स्टॉल धारकांना पर्यायी जागा दिली जात असून प्रशासकीय कामात सुधारणा केली जात आहे सध्या नगरपालिकेमध्ये १८० कायमस्वरूपी कर्मचारी असून यामध्ये ९० सफाई कर्मचारी आहेत तर १९९ कंत्राटी कर्मचारी आहेत शहरातील तीर्थस्थळांना जोडणारे सोमेश्वर कॉरिडॉर उभारण्यात येणार असून प्रशासकीय कामांमध्ये आधुनिक प्राणहिणीचा वापर केला जात आहे राज्यामध्ये कुठेही नाही असे काम संगमनेर शहरांमध्ये होत आहे यामध्ये जनतेचे सहकार्य सुद्धा महत्त्वाचे आहे. प्रशासकीय काळामधील सुमारे १५ कोटी देणे थकबाकी असून सर्व नगरसेवकांच्या सहकार्याने यावर्षी चांगली वसुली झाली आहे. जिल्हा नियोजन समितीकडून नगरपालिकेला निधी मिळण्यात आडचण येत नाही. पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचे देखील सहकार्य मिळत असल्याचे आ. तांबे यांनी अवर्जुन सांगितले. शासनाच्या विविध योजनांमधून निधी मिळवण्यासाठी आपण कटिबद्ध असून येणाऱ्या काळामध्ये एसटीपी प्लांट पूर्ण केला जाणार असल्याचे सांगताना शहरातील विविध विकास कामांबाबत त्यांनी माहिती दिली.

तर नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे यांनी प्रास्ताविकामध्ये सर्व नागरिक यांच्या सहकार्यातून संगमनेर २.० ही संकल्पना पुढे नेण्यासाठी सर्व नगरसेवक प्रशासकीय अधिकारी कटिबद्ध असून आगामी काळामध्ये संगमनेर शहरांमध्ये मूलभूत बदल सर्वांना दिसतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन उपनगराध्यक्ष नूर मोहम्मद शेख यांनी केले.

# राज्यपालांच्या स्व-गणनेने राज्यातील जनगणनेचा आरंभ

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्रात 'जनगणना २०२७' या देशातील पहिल्या डिजिटल जनगणनेचा औपचारिक शुभारंभ आज मुंबईतील लोकभवन येथे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते करण्यात आला. महाराष्ट्र स्थापना दिनाच्या औचित्याने सुरू झालेल्या या महत्त्वाच्या राष्ट्रीय उपक्रमाबद्दल राज्यपालांनी समाधान व्यक्त करत राज्यातील नागरिकांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. देशाच्या लोकसंख्येची अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत माहिती मिळवण्यासाठी ही जनगणना अत्यंत महत्त्वाची ठरणार असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

यावेळी बोलताना राज्यपालांनी सांगितले की, डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून राबवण्यात येणारी ही जनगणना देशाच्या प्रशासनिक व्यवस्थेला अधिक सक्षम आणि परिणामकारक बनवेल. नागरिकांनी स्वतःहून पुढाकार घेऊन स्व-गणना पूर्ण करावी, असे आवाहन करत त्यांनी या प्रक्रियेला सकारात्मक प्रतिसाद मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

मुख्य प्रधान जनगणना अधिकारी डॉ. निरुपमा डांगे यांनी जनगणनेविषयी सविस्तर माहिती देताना सांगितले की, स्व-गणनेचा पहिला टप्पा १ मे ते १५ मे या




कालावधीत पार पडणार आहे. या कालावधीत प्रत्येक नागरिकाने ऑनलाइन पद्धतीने स्वतःची माहिती भरायची आहे. या प्रक्रियेमध्ये एकूण ३३ प्रश्नांची उत्तरे द्यावी लागणार असून संपूर्ण प्रक्रिया अवघ्या दहा मिनिटांत पूर्ण करता येणार आहे. या डिजिटल प्रणालीमुळे वेळेची बचत होण्यासोबतच माहिती अधिक अचूक आणि सुरक्षित राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# खरात प्रकरणात मोठी कारवाई

## प्रतिभा चाकणकरांना ईडीचे समन्स

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - नाशिकमधील भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणात नवे धागेदोरे समोर येत असून तपास अधिकच गडद होत चालला आहे. महिलांच्या लैंगिक शोषणाच्या आरोपांमुळे चर्चेत आलेल्या या प्रकरणात आता आर्थिक गैरव्यवहाराचाही मोठा मुद्दा पुढे आला आहे. या पार्श्वभूमीवर प्रतिभा चाकणकर यांना सक्तवसुली संचालनालयाने म्हणजेच ईडीने समन्स बजावले आहेत.

तपासादरम्यान, समता पतसंस्थेतील काही खात्यांद्वारे मोठ्या प्रमाणावर पैशांची उलाढाल झाल्याचे उघड झाले आहे. या खात्यांचा संबंध प्रतिभा चाकणकर आणि त्यांच्या कुटुंबीयांशी जोडला जात असल्याची माहिती समोर



आली आहे. पोलिस तपासानुसार, या खात्यांमधून सुमारे २ कोटी ४० लाख रुपयांची आर्थिक हालचाल झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे या खात्यांमध्ये अशोक खरात याचे नाव नॉमिनी म्हणून नोंदवलेले असल्याचेही समोर आले आहे.या सर्व पार्श्वभूमीवर, ईडीकडून प्रतिभा चाकणकर यांना मुंबईतील कार्यालयात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले असून त्यांच्या आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी होणार आहे. या चौकशीतून अनेक महत्त्वाचे खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, प्रतिभा चाकणकर यांनी यापूर्वी सर्व आरोप फेटाळले असून, आपल्या नावाने बनावट खाती उघडण्यात आल्याचा दावा केला होता. याआधी शिर्डी पोलिसांनी त्यांची आणि त्यांच्या मुलाची तासन्तास चौकशी करून पैशांचा स्रोत आणि अशोक खरात यांच्याशी असलेले संबंध तपासण्याचा प्रयत्न केला होता.या प्रकरणामुळे आधीच राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, रुपाली चाकणकर यांना पदाचा राजीनामा द्यावा लागला होता.

# महाराष्ट्राच्या 'मिसिंग लिंक' या ड्रीम प्रोजेक्टची वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाला पूर्णतः 'ॲक्सेस कंट्रोल' बनवणारा महत्त्वाकांक्षी असलेला मिसिंग लिंक प्रकल्प सुरु झाला आहे. महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग क्षमतावाढ अंतर्गत 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचे लोकार्पण व कोनशिला अनावरणाचा कार्यक्रम संपन्न झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याहस्ते या प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले.

राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांच्या नावानं ओळखल्या जाणाऱ्या मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाच्या प्रवासात महत्वाचा टप्पा गाठला गेला आहे. मुंबई-पुणे एक्सप्रेसवमुळे घाटातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर



कमी होऊन प्रवास अधिक वेगवान आणि सुरक्षित होण्यास मदत होणार आहे.

१०.५ किलोमीटर लांबीच्या या प्रकल्पात दोन भव्य बोगदे, उंच व्हायाडक्ट आणि टायगर व्हॅलीवरील सुमारे १८२ मीटर उंच केबल-स्टेड पूल उभारण्यात आला आहे. सुमारे २३.७५ मीटर रुंद बोगदा हा जगातील सर्वात रुंद बोगद्यांपैकी एक मानला जातो. ७० किमी प्रतितास वेगाने वाहणारे वारे, मुसळधार पाऊस आणि कठीण भौगोलिक परिस्थितीत हा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला आहे. लोणावळा तलावाच्या १८२ मीटर खालून हा रस्ता जाणार आहे.

मिसिंग लिंक हा प्रकल्प केवळ रस्ता नसून आधुनिक अभियांत्रिकीचा एक अद्भूत नमुना आहे. याचे महत्त्वाचे आकर्षण म्हणजे यातील २३.५ मीटर रुंदीचा बोगदा, ज्याची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये जगातील सर्वात रुंद बोगदा म्हणून करण्यात आली आहे. हा बोगदा लोणावळा तलावाच्या चक्क १८० मीटर खालून खोदण्यात आला आहे.

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरील मिसिंग लिंक प्रकल्पामुळे ६ किलोमीटरने अंतर कमी होणार आहे. या मिसिंग प्रकल्पामध्ये खोपोली एक्झिटपासून लोणावळ्यापर्यंत दोन्ही दिशेने ४ मार्गिकांसाठीचे दोन बोगदे उभारण्यात आले आहे. यातील पहिला बोगदा ८.९२ किमी, तर दुसरा बोगदा १.७५ किमीचा आहे. तर या बोगद्याला जोडणारा आणि टागर व्हॅलीवर बांधला जाणारा केबल-स्टेड पूल जमिनीपासून सुमारे १३२ फूट उंचीवर आहे.

आता मिसिंग लिंकवर सर्वच वाहनांना परवानगी नसणार आहे. त्यात ज्वलनशील वाहने, स्फोटक किंवा धोकादायक वस्तू वाहतूक करणाऱ्या वाहनांना मिसिंग लिंक पूर्णपणे बंद असेल. या वाहनांनी पुणे-मुंबई द्रुतगती मार्गाचा वापर करावा.












# छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आक्षेपार्य विधान करणाऱ्या बाबत तक्रार दाखल करा

## एन एस यु आय व पुरोगामी युवक संघटनांची मागणी



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

समाजाचे प्रश्न व अडचणी मांडण्यासाठी, आपली विविध कौशल्य दाखविण्याठी सोशल मीडिया हे प्रभावी माध्यम आहे, मात्र दुर्दैवाने काहीजण त्याचा दुरुपयोग करीत आहे. महापुरुषांबाबत सोशल मीडियावर काहीजण आक्षेपहार्य व दिशाभूल करणाऱ्या पोस्ट टाकून धार्मिक वाद निर्माण करत आहे. अशांना कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी एन एस यु आय व पुरोगामी युवक संघटनांच्या वतीने करण्यात आली आहे.संगमनेर शहर पोलीस स्टेशनमध्ये एन एस यु आय व पुरोगामी युवक संघटनांच्या वतीने याबाबत पोलीस प्रशासनाला निवेदन देण्यात आले आहे. यावेळी शेखर सोसे, हर्षवर्धन सातपुते, गौरव गुंजाळ, ऋषिकेश मांडेकर, सार्थक गुंजाळ, सार्थक श्रीपत, सुदर्शन सानप, सत्यजित गुंजाळ, तेजस हासे, यश उगलमुगले, प्रितम साबळे, अविनाश शिंदे, राम अरगडे, सत्यजीत थोरात, आदी युवक उपस्थित होते.

या निवेदनात म्हटले आहे की, सोशल मीडियावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बाबत स्वामी आनंद स्वरूप या नावाने चालवण्यात येणाऱ्या सोशल मीडिया अकाउंट वर दिनांक २८ एप्रिल २०२६ रोजी एक अत्यंत आक्षेपार्ह व समाजातील निर्माण करणारी पोस्ट प्रसारित करण्यात आली आहे. सदर पोस्ट मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या युद्ध कौशल्याबाबत चुकीची, दिशाभूल करणारी व ऐतिहासिक दृष्ट्या अयोग्य अशी माहिती देण्यात आलेली आहे. यामुळे शिवप्रेमी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या भावना दुखावल्या गेल्या असून समाजात तणाव निर्माण होण्याची शक्यता आहे. म्हणून सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित सोशल मीडिया अकाउंट धारका विरोधात योग्य ती कायदेशीर तात्काळ कारवाई करण्यात यावी, व त्यास कठोर शिक्षा करण्यात यावी.

भविष्यात अशा प्रकारच्या भडकवून व समाज विभाग पोस्टवर पोलीस प्रशासनाने निर्बंध घालावे, व दोषींवर तातडीने कारवाई करावी, अन्यथा एन एस यु आय व पुरोगामी संघटनांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला आहे.

# आळंदी क्षेत्रातील साधकांची आई

## ह.भ.प डॉ. नारायण महाराज जाधव, आळंदी

पारनेर तालुक्यातील कर्जुले गावाचे मूळ रहिवासी असलेले प.पू. नारायण महाराज व्यावसायाने शरीराचे डॉक्टर आहेत. पण ते आता अनेकांचे सूक्ष्म देहाचे डॉक्टर आहेत.

**ते चालते ज्ञानाचे बिंब ।**
**तयाचे अवयव सुखाचे कोंभ ।**
**येर माणूसपण भांब। लौकिक भागू ।।**

डॉक्टर महाराजांचे जीवन हे वारकरी संप्रदायात आतिशय आदर्श आहे. कुणाकडे पाहून परमार्थाची वाटचाल करायची तर त्यासाठी आदरणीय डॉ. नारायण महाराज आहेत.

**जय जय वो शुध्दे । उदारे प्रसिध्ये।**
**अनवरत आनंदे वर्षा तिये ।।**

कृपाळू, ब्रह्मनिष्ठ व उदार या सर्व गुणांनी परिपूर्ण असे साधकांची आई म्हणजे आदरणीय डॉक्टर नारायण महाराज जाधव आहेत.

**मितले आणि रसाळ । साच आणि मवाळा शुद्ध जैसे कल्लोळ। अमृताचे।**

ज्यांची वाणी तप साधनेने पिकलेली आहे. संत वचनावर, वेदांवर अत्यंतिक श्रद्धा असलेले, आत्मोन्नती साधणाऱ्या प्रत्येक जीवावर दया बुद्धी असणारे आमचे डॉक्टर महाराज म्हणजे उघडे ब्रह्म आहे.

**तुका म्हणे मुक्ती परिणीली नोवरी ।**
**आतां दिवस चारी खेळीमेळी ।।**

असे ज्यांचे जीवन आहे. सतत् ब्रम्हानंदामध्ये रत असलेले, सर्वांना आपलेसे वाटणारे, जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती। देह कष्टावती परोपकारे.

**ते चालते ज्ञानाचे बिंब।**
**तयाचे अवयव सुखाचे कोंभ।**
**येर माणूसपण भांब। लौकीक भागू ।**

डॉक्टर महाराजांचे जीवन हे वारकरी



सांप्रदायात कुणाकडे पाहून परमार्थाची वाटचाल करावी असे आहे.

आमच्या आनंदे। वर्षातये ।। कृपाळू, ब्रह्मनिष्ठ व उदार या सर्व गुणांनी आणि परिपूर्ण असे साधकांची आई. अशी ज्यांची पिकलेली वाणी. संतवचनावर, वेदावर अत्यतीक श्रद्धा असणाऱ्या आत्मोन्नतीचा मार्ग दाखविणारे, प्रत्येक जीवावर दया, बुद्धी असणारे, आमचे डॉक्टर महाराज म्हणजे महाराष्ट्रातील दिपस्तंभ आहे.

ज्यांच्या जीवनाचा प्रत्येक क्षण हा लोककल्याणार्थ समर्पित आहे. संपूर्ण काळ हा ज्यांचा चिंतनासाठीच असतो. अनेक तरुण महाराजांचे दिशादर्शक जीवन असणारे आपल्या प्रत्येक सूक्ष्म कृतीतून अनेकांच्या उध्दाराचे प्रयोजन करणारे, आपल्या सूक्ष्मकृतीतून अनेकांच्या उद्धाराचे प्रयोजन करणारे, उच्चार व आचार यांची उत्कृष्ट सांगड घातलेले जीवन म्हणजे आदरणीय डॉक्टर नारायण महाराज आहेत.

अनन्तश्री विभूषित श्रोत्रिय, ब्रह्मनिष्ठ व कृपाळू, ज्ञानोत्तर प्रेम लक्षणात्मक भक्ती रसाचे मूर्तिमंत स्वरूप असणारे स्वरूप म्हणजे डॉक्टर महाराज आहेत.

वेदान्त - सिद्धान्ताचा दृढ अपरोक्ष साक्षात्कार, साधकांसाठी डॉक्टर महाराजांनी आतापर्यंत आतापर्यंत ३७ ग्रंथांचे लेखण केले. विचारसागर, वृत्ती प्रभाकर, ग्रंथराज ज्ञानेश्वरी, भगवद्गीता, तुकाराम गाथा, सकल संतवाङ्मय, अमृतानुभव या सर्व ग्रंथावर सतत निरुपण करत त्यांचे जिवन पवित्र होत आहे. महाराज सर्व साधकांची आई आहेत. आईच्या ममतेने असंख्य तरुण महाराजांचे अध्यात्मिक व व्यवहारिक संगोपन ते करतात. महाराजांकडे तयार होणारी त्यागी, आचारशील, किर्तनकार, प्रवचनकार यांची मांदियाळी फार मोठी आहे. वारकरी सांप्रदायाची खरी परंपरा जोपासणारे, अनेक महाराजांना घडविणारे डॉक्टर संपूर्ण महाराष्ट्राला दीपस्तंभ सारखे आहेत.

महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाची परंपरा पुढे चालविणारी महाराजानी समाजाला फार मोठी पिढी प्रदान केली आहे.

**किंबहुना तृषितालागी।**
**पाणी आरायीले जगी।**
**तैसे दुःखितांचे सेलभागी ।**
**जिणे जयाचे ।।**

असे ज्यांचे जगणे आहे.

**पुज्यता डोळा न देखावी।**
**स्वकिर्ती कानी नायकावी।**
**हा अमुका ऐसी नोहावी ।**

असे समर्पित जीवन ज्यांचे आहे त्या वंदनीय डॉक्टर नारायण महाराजांना मी वंदन करतो.

ज्यांच्या चरणांकडे पाहून आपले आचरण असावे अशा महान परमपूज्य गुरुवर्य डॉक्टर नारायण महाराजांच्या चरणी साष्टांग दंडवत

**आपला संत चरणरज**
**ह. भ. प. अरुण महाराज फरगडे गुरुजी**
**संगमनेर, मोबा. ९८८१७ ६५८५६**

# लाडक्या बहिणींच्या खात्यावर येणार आता साडेचार हजार रूपये?

मुंबई (प्रतिनिधी)-

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या राज्यातील महिलांना ईकेवायसी दुरूस्तीसाठी दिलेली मुदत ३० एप्रिल रोजी संपली आहे. ईकेवायसी प्रोसेस झाल्यानंतर आता लाडकीच्या खात्यात पैसे कधी येणार ? असा सवाल पात्र महिलांना पडला आहे. मार्च, एप्रिल महिन्याचा हप्ता अजून लाडक्या बहिणींच्या खात्यात आलेला नाही. त्यात आता मे महिना सुरू झाला आहे. त्यामुळे लाडक्या बहिणींना सरकार एकत्र ४५०० रूपये देणार का? या चर्चेला सुरूवात झाली आहे. ईकेवायसी दुरूस्तीनंतर राज्यातील लाडक्या बहिणींची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार अर्ज बाद झाले, अपात्र ठरले अथवा अर्जच भरला नाही अशा लाडक्या बहिणींची संख्या तब्बल ५४ लाख असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या ५४ लाख लाडक्या बहिणींचा १५०० रूपयांचा हप्ता आता कायमचा बंद झाला आहे. त्यामुळे सरकारचे प्रत्येक महिन्याला कोट्यवधि रूपये वाचणार आहे. ई-केवायसी प्रक्रियेनंतर १ कोटी ८९ लाख बहिणी पात्र ठरल्याची माहिती समोर आली आहे. महाराष्ट्र सरकारकडून ईकेवायसी दुरूस्तीची मुदत वाढवण्यात आली नाही. त्यामुळे राज्यात १ कोटी ८९ महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ प्रत्येक महिन्याला मिळणार आहे.

राज्यातील पात्र महिलांच्या खात्यात फेब्रुवारी महिन्यापर्यंत १५०० रूपये जमा झाले आहेत. पण त्यानंतर मागील २ महिन्यांपासून लाडक्या बहिणींच्या खात्यात एकही हप्ता जमा झालेला नाही. आता केवायसीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यामुळे लाडकीच्या खात्यात पैसे जमा होतील, याकडे महिलांच्या नजरा खिळल्या आहेत. पण लाडकीच्या खात्यात ३ हप्त्याचे एकत्र ४५०० रूपये जमा होणार का? मार्च, एप्रिल आणि मे महिन्यांचा हप्ता राज्यातील पात्र महिलांच्या खात्यात येणार का? की फक्त मार्च महिन्याचा अथवा मार्च-एप्रिल महिन्यांचा ३ हजारांचा हप्ता जमा होणार, यावर सस्पेन्स कायम आहे.

# राजापूर येथे ‘विराट हिंदू संमेलन’चे आयोजन

राजापूर (युवावार्ता प्रतिनिधी)-

सशक्त हिंदू - समर्थ भारत आणि प्रखर राष्ट्रभक्तीच्या प्रेरणेने राजापूर येथे शनिवार, २ मे २०२६ रोजी ‘विराट हिंदू संमेलन’ाचे आयोजन करण्यात आले आहे. हे संमेलन सायंकाळी ७ वाजता हनुमान मंदिर मैदानावर पार पडणार आहे.

या संमेलनात हिंदूराष्ट्र सेना राष्ट्रीय अध्यक्ष धनंजयभाई देसाई हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार असून, धर्म जागरण प्रांत



मंडळ सदस्य सुनीलजी दत्तात्रय काळे यांचेही मार्गदर्शन लाभणार आहे.

राजापूर परिसरातील सकल हिंदू समाजाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, जवळे कडलग, वडगाव लांडगा, निमगाव भोजापूर, चिकणी व सायखिंडी येथील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

जात-पात की करो विदाई, हिंदू-हिंदू भाई-भाई असा सामाजिक एकतेचा संदेश देत सर्व हिंदू बांधवांनी कुटुंबासह उपस्थित राहावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# झेडपी शाळेतील शिक्षणामुळे मी नवोदयला पास - डिवायएसपी सोनवणे

अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)-

शाळेचा खरा चेहरा हा शिक्षक असतो, तो एका बाजुने शाळेच्या भौतिक सुविधांना प्राधान्य देतो आणि दुसऱ्या बाजुने विद्यार्थ्यांना आकार देत असतो. यातुनच गुणवत्तापुर्ण शिक्षण घडत असते. मी देखील जिल्हा परिषद शाळेत शिकलेलो आहे आणि मी ही नवोदय परिक्षा पास झालो होतो. अर्थात आमचे शिक्षक चांगले होते, आमच्याकडून अभ्यास करुन घेत होते आणि आमचे पालक देखील आम्हाला जवळ घेऊन समजून सांगत असे. म्हणून तर आम्ही घडलो. शिक्षण ही एकांगी चालणारी प्रक्रिया नाही, जितका प्रयत्न शिक्षक घेतात तितकेच परिश्रम पालकांनी देखील घेतले पाहिजे. तेव्हा खऱ्या अर्थाने स्पर्धेच्या युगातला विद्यार्थी घडत असतो. असे मार्गदर्शन पोलीस उपाधिक्षक कुणाल सोनवणे यांनी केले. ते उंचखडक बु येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करताना बोलत होते. यावेळी व्यासपिठावर गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब दोर्गे, कृषी अधिक्षक भुषण चत्तर, केंद्रप्रमुख बडे सर, बस डेपो अधिकारी सचिन वाकचौरे आदी उपस्थित होते.



सोनवणे म्हणाले की, उंचखडक बु शाळेचा खडतर प्रवास आम्ही ऐकला आहे. पहिल्याच वर्षात मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमात प्रथम क्रमांक, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात निवड, आयएसओ मानांकन, नवोदय विद्यालयात विद्यार्थ्यांची निवड, सैनिकी स्कुलसाठी निवड, सावित्रिबाई शिष्यवृत्तीत विद्यार्थ्यांचे क्रमांक, लक्षवेध, मिशन आरंभ, गणित विज्ञान स्पर्धेत प्रथम क्रमांक अशा विविध स्पर्धेत पहिल्याच प्रयत्नात यश संपादन करणे ही फार कौतुकाची बाब आहे. यामागे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ड. सागर शिंदे, गोविंद खोकले, विक्रम गायकर, काळु तपासे यांसारख्या व्यक्तींचे अथक परिश्रम असल्याचे दिसते. विशेष म्हणजे बंद पडलेली शाळा सुरु करणारे रवि रुपवते यांचे आणि साथ देणारे पालक व गावकरी यांचे देखील आभार मानले पाहिजे. एक चांगला शिक्षक गाव आणि शाळा व्यवस्थापन समितीला सोबत घेऊन काय करु शकतो, याचे उत्तम उदा. म्हणजे उंचखडक बु ची शाळा आहे, असे मला वाटते. छोट्या जागेत फोर मोठे काम करुन एक आदर्श शाळा उभे करण्याचे काम शिक्षक आणि ग्रामस्थांनी केले आहे. हाच आदर्श प्रत्येक गावांनी घेतला पाहिजे, असे कुणाल सोनवणे म्हणाले.

यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला, इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आणि शेवटी खाऊगल्लीचा कार्याक्रम पार पडला. या कार्यक्रमासाठी राहुल देशमुख, ड. सागर शिंदे, आबासाहेब मंडलिक, अंकुश वैद्य, घुले मॅडम, क्षिरसागर मॅडम, बडे मॅडम, सचिन वाकचौरे, अक्षय देशमुख, तुषार देशमुख, अक्षय शिंदे, अमोल शिंदे, गोविंद खोकले, श्यामराव देशमुख यांनी अथक परिश्रम घेतले.

झेडपी शाळेंचा दर्जा उंचावत आहे.

जिल्हा परिषद शाळेंचा दर्जा आता उंचावत चालला आहे. अनेक ठिकाणी शाळेंचे भौतिक स्ट्रक्चर सर्वेत्तम दिसून येते. त्यामुळे, विद्यार्थ्यांना शाळेविषयी आकर्षण वाटते. आलेल्या विद्यार्थ्यांना सर्वेत्तम गुणवत्ता देण्याचे काम आपले शिक्षक करत आहेत. उंचखडक बु ची शाळा ही देखील त्यातलेच एक आदर्श उदाहरण आहे. शुन्यातून सुरु केलेला प्रवास आज राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात निवड होण्यापर्यंत गेला आहे. भविष्यात देखील या शाळेचे विद्यार्थी गुणवत्तेत चमकल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी शिक्षण विभागाकडून जे काही सहकार्य लागेल, ते आम्ही सर्वेतोपरी देण्याचा प्रयत्न करु. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन आणि प्रथम वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत.

बाळासाहेब दोर्गे
(गटशिक्षण अधिकारी, अकोले)

# पोलीस पाटील यांची पत्रकाराला कायमचा बंदोबस्त करण्याची धमकी, गुन्हा दाखल

पुणे (प्रतिनिधी)-

देवस्थान ट्रस्टच्या विरोधात बातम्या केल्यामुळे ट्रस्टचे सचिव तथा कामगार पोलीस पाटील गोपीनाथ बाळासाहेब ढगे यांनी पत्रकार आशिष ढगे यांना फौजदारी गुन्ह्यात अडकविण्याचे व कायमचा बंदोबस्त करण्याची लेखी धमकी दिल्याबद्दल गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबदची माहिती अशी की, कळस बु, ता. अकोले येथील देवस्थान ट्रस्टच्या विरोधात पत्रकार आशिष ढगे यांनी त्यांच्या न्यूज पोर्टलवर ट्रस्टच्या विश्वस्त मंडळाने घटनेत विश्वस्त हे तह्यात म्हणजे कायम करण्याचा तसेच विश्वस्त मंडळातील रिक्त जागा भरण्याचा अधिकारही विश्वस्त मंडळाला ठेवण्याचा निर्णय बाबत बातम्या केल्या. यामुळे कळसच्या नागरिकांमध्ये जनजागृती केल्यामुळे गोपीनाथ ढगे यांनी एक प्रसिद्धी पत्रक काढून पत्रकार हे ब्लॅक मेलिंग करून पैसे कमविण्यासाठी हे धंदे करीत असल्याचा आरोप केला असून, बातमी देणे बंद न केल्यास फौजदारी गुन्ह्यात अडकविण्याचे तसेच गावकऱ्यांच्या मदतीने कायमचा बंदोबस्त करण्याची धमकी दिली आहे.

यासंदर्भात पत्रकार आशिष ढगे यांच्या फिर्यादीवरून पुणे जिल्ह्यातील दक्षिण म्हाळुंगे एम आय डी सी पोलीस स्टेशन, गुन्हा रजि. ७१९/२०२६, बी.एन.एस. ३५१(४) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक आर. एम. घुले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार रेंगडे हे करीत आहे.

गावचे पोलीस पाटील हे गावात कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचे काम असते, तंटामुक्त गाव समितीचे सचिव म्हणून गावात समन्वय राखणे, गावातील परस्पर विरोधी वाद गावात मिटवणे असे काम असताना, उलट आपल्या पदाचा दुरूपयोग करून पत्रकाराला व त्याला सहाय्य करणाऱ्यांचा कायमचा बंदोबस्त करण्याची लेखी धमकी दिली आहे. आपल्या कर्तव्यात कसूर केली असून अधिकाराचा गैरवापर केला आहे. त्यामुळे पोलीस पाटील गोपीनाथ ढगे यांच्या पासून जीवितास धोका निर्माण झाला असून, मी न्यायालयातही दाद मागणार आहे, तरी त्यांच्यावर पोलिसांनी तातडीने कारवाई करावी, अशी मागणी आशिष ढगे यांनी केली आहे.

# संपादकीय...

## मराठी सक्ती की दिखावा!

## १०० दिवसांची मुदत केवळ विलंब?

महाराष्ट्रात रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषा बंधनकारक करण्याच्या निर्णयावरून निर्माण झालेला वाद हा केवळ भाषेपुरता मर्यादित नसून तो प्रशासन, राजकारण आणि सामाजिक मानसिकता यांचा गुंतागुंतीचा प्रश्न बनला आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सुरुवातीला कठोर कारवाईचा इशारा दिला, मात्र नंतर सरकारने चालकांना मराठी शिकण्यासाठी १०० दिवसांची मुदत दिली. या मुदतीत पडताळणी, प्रशिक्षण आणि मार्गदर्शन होणार असल्याचे सांगितले जात आहे, परंतु प्रत्यक्षात या निर्णयाची अंमलबजावणी कितपत प्रभावी होणार, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे. अनेक वर्ष महाराष्ट्रात वास्तव्यास असलेले परप्रांतीय चालक आजवर मराठी शिकले नाहीत, तर आता ते एवढ्या अल्प कालावधीत शिकतील का, ही शंका स्वाभाविक आहे. मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून महाराष्ट्राची ओळख, संस्कृती आणि व्यवहाराचा पाया आहे. सार्वजनिक सेवेत काम करणाऱ्या चालकांनी प्रवाशांशी संवाद साधण्यासाठी स्थानिक भाषा येणे ही अपेक्षा योग्यच आहे. प्रवाशांना येणाऱ्या अडचणी, गैरसमज आणि संवादातील अडथळे यामुळेच या निर्णयाची गरज भासली आहे. मात्र, केवळ आदेश देऊन भाषा शिकवता येत नाही, याची जाणीव ठेवावी लागेल. भाषा शिकण्यासाठी गरज, सवय आणि मानसिक तयारी आवश्यक असते. जर चालकांना मराठी शिकण्याची खरी गरज वाटली, तर ते सहज शिकतील; अन्यथा कोणतीही मुदत अपुरीच ठरेल. या प्रश्नाचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे समाजाची भूमिका. महाराष्ट्रात अनेकदा मराठी भाषकच स्वतःहून हिंदी किंवा इतर भाषेत संवाद साधतात. त्यामुळे परप्रांतीयांना मराठी शिकण्याची गरजच भासत नाही. उलट, जर प्रत्येक नागरिकाने आपल्या दैनंदिन व्यवहारात मराठीचा आग्रह धरला, तर परिस्थिती आपोआप बदलू शकते. दक्षिण भारतातील राज्यांचा अनुभव पाहिला तर तेथे स्थानिक भाषेचा आग्रह इतका ठाम आहे की बाहेरून येणाऱ्यांना ती भाषा शिकणे भाग पडते. महाराष्ट्रात मात्र हा आग्रह कमी पडतो, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. तिसरा आणि कदाचित सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे राजकारण. परप्रांतीय मतदारसंख्या अनेक ठिकाणी निर्णायक ठरते, त्यामुळे कोणत्याही सरकारला कठोर निर्णय घेताना राजकीय गणिते पाहावी लागतात. परिणामी, घोषणांमध्ये कठोर भूमिका दिसते, पण अंमलबजावणीत मवाळपणा येतो. १०० दिवसांची मुदत देणे हे याचेच उदाहरण मानावे लागेल. जर मुदत संपल्यानंतरही कारवाई झाली नाही, तर हा निर्णय केवळ घोषणेतच मर्यादित राहील. त्यामुळे शासनाची विश्वासार्हता टिकवण्यासाठी ठोस आणि सातत्यपूर्ण कारवाई अत्यावश्यक आहे. मात्र, या संपूर्ण वादातून एक सकारात्मक बाबही पुढे येते, ती म्हणजे मराठी भाषेच्या जतनाबाबत वाढती जागरूकता. सरकारने प्रशिक्षण, परीक्षा आणि पडताळणी यांसारख्या उपाययोजना राबवण्याचा प्रयत्न केला आहे, हे स्वागतार्ह आहे. पण त्याचबरोबर कठोर अंमलबजावणी आणि स्पष्ट धोरण आवश्यक आहे. अन्यथा, वारंवार मुदतवाढ देण्याची परंपरा सुरू राहील आणि नियमांचे महत्त्व कमी होईल. शेवटी, हा प्रश्न केवळ चालकांचा नाही, तर संपूर्ण समाजाचा आहे. मराठी भाषा टिकवायची असेल, तर तिचा वापर वाढवणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. प्रवाशांनी मराठीत संवाद साधण्याचा आग्रह धरला, तर चालकांना मराठी शिकावीच लागेल. अन्यथा, कितीही कायदे आणि मुदती दिल्या तरी अपेक्षित परिणाम मिळणार नाही. त्यामुळे खरा प्रश्न असा आहे की १०१ व्या दिवशी चालक मराठी बोलतील का, यापेक्षा आपण स्वतः मराठी बोलण्याचा आग्रह धरू का? याचे उत्तरच या वादाचे भवितव्य ठरवणार आहे.

# सह्याद्री कॉलेजमध्ये वाणिज्य शाखेचा विद्यार्थ्यांसाठी आयबीपीएस उत्तीर्ण राहुल खेमनर यांचे मार्गदर्शन



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- सह्याद्री ज्युनियर कॉलेजमधील वाणिज्य विभागाच्या वतीने वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी नुकतेच आयबीपीएस तसेच एअरपोर्ट अथॉरिटी ऑफ इंडिया परीक्षा उत्तीर्ण झालेले श्री. राहुल सखाराम खेमनर यांचे मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य एस. एम. खेमनर सर उपस्थित होते. प्रास्ताविकात वाणिज्य विभाग प्रमुख प्राध्यापक ए. के. दातीर सर यांनी वाणिज्य शाखेतील विविध अभ्यासक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना करून दिली. तसेच राहुल खेमनर यांचा प्रेरणादायी जीवनप्रवास विद्यार्थ्यांसमोर मांडत त्यांच्या यशामागील परिश्रम, जिद्द आणि चिकाटीचे महत्त्व अधोरेखित केले.

यावेळी प्राचार्य एस. एम. खेमनर सर यांनी खेमनर कुटुंबाचे वैशिष्ट्य सांगितले की, त्यांच्या तीनही मुली राज्य शासकीय सेवेत उच्च पदस्थ अधिकारी म्हणून कार्यरत असून, मुलगा राहुल खेमनर यांनी आयबीपीएस व एअरपोर्ट अथॉरिटी ऑफ इंडिया या दोन्ही स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होऊन कुटुंबाचा व संस्थेचा गौरव वाढविला आहे. शिक्षक प्रतिनिधी श्री. जी. एल. गुंजाळ सर यांनी वाणिज्य विभागात राबविण्यात येणाऱ्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे कौतुक केले. तसेच विद्यार्थ्यांनी बँकिंग व इतर स्पर्धा परीक्षांची माहिती गांभीर्याने घेतल्यास रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होऊ शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले.

आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात राहुल खेमनर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत आपण सह्याद्री महाविद्यालयाचेच इयत्ता दहावी व बारावीचे माजी विद्यार्थी असल्याचे सांगितले. आज जे काही संस्कार व यश मिळाले आहे, ते सह्याद्री संस्था व आई-वडिलांमुळेच, असे त्यांनी नमूद केले. त्यांनी बँकिंग क्षेत्रातील विविध संधी, परीक्षा पद्धती, अभ्यासक्रम व तयारीचे तंत्र याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच पीपीटीच्या माध्यमातून विविध स्पर्धा परीक्षांची माहिती देत विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. विद्यार्थ्यांनी बारावीनंतर आपल्या ध्येयानुसार योग्य स्पर्धा परीक्षा निवडून नियोजनपूर्वक अभ्यास केल्यास यश नक्की मिळू शकते, असा मौलिक सल्लाही त्यांनी दिला. बँकिंग व स्पर्धा परीक्षांबाबत सखोल माहिती मुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वासाची नवी ऊर्जा निर्माण झाली.

यावेळी व्यासपीठावर पर्यवेक्षक बी. एस. कुटे, शिक्षक प्रतिनिधी जी. एल. गुंजाळ व वाणिज्य विभाग प्रमुख ए. के. दातीर, प्राध्यापक एन. आर. जगताप, प्राध्यापिका एस. व्ही. म्हस्के, प्राध्यापिका व्ही. एम. गुळवे आणि प्राध्यापक जी. सी. भवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एन. आर. जगताप यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्राध्यापिका व्ही. एम. गुळवे मॅडम व प्राध्यापिका एस. व्ही. म्हस्के यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विभागातील सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.


**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४ | डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

**SUBSCRIBE YOUTUBE**
Daily Yuvavarta

**जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी**

**पाहिजेत**
Venkatesh
सरस्वती ॲग्रो इंडस्ट्रीज करीता अर्जंट भरती चालू आहे
- टेलीकॉलिंग — 10 जागा — फ्रेशर १० ते १२ हजार पगार व अनुभवास १३ ते १५ हजार (कुठलीही शाखेची पदवी उत्तीर्ण व महिलांना प्राधान्य)
- प्रोडक्शन लाइन — 10 जागा — पगार- ८ ते १० हजार (महिलांना प्राधान्य)
- Dispatch सुपरवाइझर — 02 जागा — (कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण महिलांना प्राधान्य)
- ड्रायवर - पगार- १५ हजार — 05 जागा — (ड्रायविंग लायसेंस व् अनुभव आवश्यक)

अर्जासह प्रत्यक्ष भेटा कॉल व भेटीची वेळ 10.00 ते 5.00
**सरस्वती ॲग्रो इंडस्ट्रीज**
संगमनेर औद्योगिक वसाहत, प्लॉट नं. 127 /A , संगमनेर, जि. अ.नगर
9699363221

**पतसंस्थेस कार्यालयासाठी जागा पाहिजे**
संगमनेर शहराच्या बसस्थानक, नविन नगर रोड, जाणता राजा मार्ग व मार्केट यार्ड, नाशिक रोड परिसरात पतसंस्था कार्यालयासाठी अंदाजे १ ते २ गुंठे कारपेट क्षेत्राची बांधीव किंवा प्लॉट (ओपन स्पेस) जागा मालकी तत्वावर घेणे आहे. इच्छुकांनी सात दिवसात जागेचा नकाशा, आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती व अपेक्षीत दर इत्यादी माहितीसह पतसंस्था कार्यालयाच्या पुढील पत्त्यावर सत्वर अर्ज करावेत.
संपर्क
श्री यशोदेव नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,
मालाणी निवास, बाजारपेठ, संगमनेर
मो. ९८२२६७६१७८, ९८२२६०८३६७


## विजय नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, संगमनेर

ऋणानुबंध, पुणे नाशिक रोड, संगमनेर, जि. अहिल्यानगर ४२२६०५.
फोन नं. ०२४२५ २२६०८३, मोबा. ९४०३९३४०९५

### तारण सोन्याचा जाहीर लिलाव

खालील सोनेतारण थकबाकीदारांच्या दागिन्यांचा जाहीर लिलाव मंगळवार दिनांक ०५/०४/२०२६ रोजी करण्याचे ठरविले आहे. लिलावात भाग घेऊ इच्छुकांनी दुपारी ४.०० वाजता संस्थेच्या गणेशनगर शाखा मुख्यकार्यलयात उपस्थित राहावे.

| अ.क्र. | नाव | पत्ता |
|---|---|---|
| १ | जोशी वसंत गोपीनाथ | चंद्रशेखर चौक, संगमनेर |
| २ | भांगरे वैभव दिनकर | टाकेवाडी पो. पिंपळगाव माथा, संगमनेर |
| ३ | पाडेकर मनोज सुधाकर | पाण्याची टाकी समोर परदेशपुरा, संगमनेर |
| ४ | शेख शबाना फैयाज | जमजम कॉलनी, सरकार लॉन्स जवळ, संगमनेर |
| ५ | मेढे शालन एकनाथ | हनुमानवाडी पो. सारोळे पठार, संगमनेर |
| ६ | गायकवाड लता आनंदा | वडगावपान, संगमनेर |
| ७ | रोहम वैभव रघुनाथ | दुध डेअरी मागे, वाघापूर, संगमनेर |
| ८ | लोखंडे सुनील मारग्या | यशवंत नगर, वैदुवाडी, संगमनेर |
| ९ | राऊत कैलास तुकाराम | ग्रीन पार्क सोसायटी, नाशिक रोड, संगमनेर कॉलेज, घुलेवाडी |

सुचना- थकबाकीदराने लिलाव तारखेच्या आत दागिने सोडविल्यास अगर नूतनीकरणकेल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.

श्री. योगेश उपासनी
सरव्यवस्थापक
विजय नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, संगमनेर


**पाहिजेत**
वामनराव इथापे बी.एच.एम.एस. कॉलेजकरिता खालील पदे भरणे आहे
अकौंटंट – ०२ जागा
पात्रता – बी.कॉम/ एम. कॉम
कॉम्प्युटर ऑपरेटर – ०२ जागा,
पात्रता – बी. कॉम
एल.एम. व्ही. वाहन चालक – ०३ जागा, अनुभवी
वॉचमन – ०३ जागा
पत्ता– डॉ. इथापे हॉस्पिटल, नवीन नगर रोड, संगमनेर
संपर्क - 9370071777
9518556933, 9822791484

**ड्रायव्हर पाहिजे**
ऑटोमॅटिक गाडीसाठी ०१ जागा
मॅन्युअल गेअर गाडीसाठी ०१ जागा
निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
8668269897


**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
AHMED BIBAN TAMBOLI
TO NEW NAME AS
AHAMAD BIBAN TAMBOLI
VID AADHAAR NO : 8532 8024 4286
ADRESS - AT SAMNAPUR, TAL - SANGAMNER, 422605

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
AMOL MARUTI PAWABAKE
TO NEW NAME AS
AMOL MARUTI PAWBAKE
ADD - SANGAMNER
TAL- SANGAMNER,
DIST - A. NAGAR
ADHAR NO.- 219289212611


**भाड्याने देणे आहे**
रुम भाड्याने देणे आहे
२०० स्क्वे.फुट सर्व सुविधांयुक्त
पत्ता– शिवाजी नगर गल्ली, नं.१,संगमनेर
९४०४९१७९१२
९४०३१५४०१७

**पाहिजेत**
युवा ध्येय वृत्तपत्र संगमनेर कार्यालयासाठी अर्जंट पाहिजे
उपसंपादक - १
जाहिरात व्यवस्थापक - १
डिझायनर - १
वितरण व्यवस्थापक - १
टेलिकॉलर - १
कार्यालय - युवा ध्येय, विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स, अकोले रोड, संगमनेर
फोन (०२४२५)२६१८७२
७७६८०७९२७२,९३७०७७३५०४


## जाहीर निवीदा सुचना

माहेश्वरी पंच ट्रस्ट, संगमनेर यांना खालील प्रमाणे बांधकाम करावयाचे आहे. त्याकरीता ट्रस्ट प्रतिथयश कंत्राटदार / ठेकेदारांकडून निवीदा मागवित आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | टेंडर फॉर्म फी |
|---|---|---|
| १ | जुन्या राजस्थान चित्र मंदीर मेनरोड या जागेवरील शॉपिंग कॉम्प्लेक्स इमारतीचे बांधकाम | २०००/- Non Refundable |

१) टेंडर फॉर्म कामकाजाच्या वेळेत माहेश्वरी पंच ट्रस्टच्या कार्यालयात श्री. अजय दिलीप चायल मो.नं. ९६८९९८९६२७ यांचेकडे मिळतील.
२) निवीदा फॉर्म सोमवार दिनांक २७/०४/२०२६ सकाळी १० पासून उपलब्ध होतील.
३) निवीदा फॉर्म जमा करण्याची अंतिम तारीख शनिवार दिनांक ०२/०५/२०२६ सायं ५.०० वाजेपर्यंत राहिल.
४) निवीदा मंजूर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार ट्रस्टने राखुन ठेवला आहे.

**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com | दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ मृत्यू नोंद/५०५/२०२६ | संगमनेर, दिनांक – १७/०२/२०२६

### जाहिरनामा

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. साहेबराव बाबासाहेब हजारे रा. पिंपळगाव देपा, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक १७/१०/२०२५ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. पिंपळगाव देपा, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचे आजी नामे गवुबाई शिवराम हजारे यांचा मृत्यू मौजे पिंपळगाव देपा, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक २१/१०/२०२१ रोजी झाला असून त्यांची मृत्यू नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी पिंपळगाव देपा यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी पिंपळगाव देपा यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com | दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ मृत्यू नोंद/५२६/२०२६ | संगमनेर, दिनांक – २३/०३/२०२६

### जाहिरनामा

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्रीमती सुवर्णा महावीर गुळवे, रा. संगमनेर खुर्द, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक २६/०२/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. संगमनेर खुर्द, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचे पती नामे महावीर कारभारी गुळवे यांचा मृत्यू मौजे रायतेवाडी ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक ३०/११/२०२४ रोजी झाला असून त्यांची मृत्यू नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी रायतेवाडी यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी रायतेवाडी यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**


**भाड्याने देणे आहे**
सुकेवाडी रोड टच असलेला संपूर्ण कलर केलेला
१२ X १२ फूट गाळा
भाड्याने देणे आहे
हा गाळा सलून, पार्लर, इस्त्री, टेलर, ऑफिस, नाश्ता पॉईंट किंवा गोडाऊनसाठी योग्य आहे
८२८२८२५८१८

**ड्रायव्हर पाहिजे**
गिअर आणि ऑटोमॅटिक कारसाठी अनुभवी ड्रायव्हर पाहिजे
आकर्षक पगार
श्री गुलाब आर्च
संपर्क – नविन नगर रोड, संगमनेर
8378956909
8459199913

**पाहिजेत**
अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरू मुले पाहिजेत
जितेंद्र लाहोटी (चार्टर्ड अकाऊंटंट)
मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर
9822523424

**पाहिजेत**
श्री गणेश डिस्ट्रीब्युटर्स, विडोल ऑईल संगमनेर या फर्मसाठी
अकाउंटंट – १ जागा (बी. कॉम/ टॅली)– पुरुष
सेल्समन – १ जागा (वय वर्ष २२ ते ३२)
पगार – १४०००+ इन्सेंटिव्ह
शिक्षण – बारावी व त्यापुढील
8999862759

**पाहिजेत**
मसाज थेरपिस्ट १ जागा (पुरुष)
फिजिओथेरपिस्ट १ जागा (पुरुष)
रुग्णांचा काळजी घेणारे काका आणि मावशी
सप्तश्रृंगी हॉस्पिटल ॲण्ड पॅरालिसिस सेंटर, मुक्ताई मंदिराजवळ, रायते-वाघापूर, ता. संगमनेर, जि- अहिल्यानगर
9657230023

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६









दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४
वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# सोमनाथ घार्गेंची अचानक बदली

## मुम्मक्का सुदर्शन नवे जिल्हा पोलीस प्रमुख



अहिल्यानगर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
अहिल्या नगर जिल्हयात गो तस्करांना सळो की पळो करून सोडणारे, अनेक गुन्हेगारांना हद्दपार करणारे तसेच राज्याला नव्हे देशाला हादरे देणारा लिंगपिसाट भोंदू अशोक खरातचे प्रकरण उजेडात आणणारे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची गुरुवारी सायंकाळी अचानक बदली करण्यात आली. त्यांच्या जागी चंद्रपूरचे पोलिस अधीक्षक मुम्मक्का ....... यांची नियुक्ती करण्यात आली. तसे आदेश गृहविभागाने काढले आहेत.

एसपी सोमनाथ घार्गे यांच्या काळात जिल्हयातील नगरपालिका व महानगर पालिका निवडणुका शांततेत पार पडल्या. जिल्ह्याला शाप असलेले गोतस्करांचे गुन्हे प्रत्येक तालुक्यात उघड करून धडक कारवाई त्यांनी केली. अनेक गुन्हेगारांना जेरबंद करून हद्दपार केले. राहुरीची विधानसभा पोटनिवडणुक शांततेत पार पडली. नगर शहर, श्रीरामपूर, संगमनेर, नेवासा, ममदापूर, शेवगांव, पाथर्डी, कर्जत, कोपरगांव या भागात अनेक गुन्हेगारांना जेरबंद केले.

जिल्ह्याचे कार्यक्षेत्र मोठे असतांनाही अनेक प्रमुख गुन्ह्यांची उकल त्यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने केली. खोट्या तक्रारीची पद्धत जिल्हयात काही राजकारणी व त्याचे हस्तक वापरतात, परंतू अशा तक्रारींना एसपी घार्गे यांनी 'भिक' घातली नाही. त्यांची अनेक कौतुकास्पद कामगीरीची उदाहरणे आहेत. मात्र एसपी सोमनाथ घार्गे यांची बदली झाल्याने लिंगपिसाट भोंदू खरातचे प्रकरण उघड केल्याने त्यांची अचानक बदली करून त्यांना 'बक्षीस' देण्यात आले का? असा प्रश्न जिल्हयातील सुज्ञ नागरीकांच्या मनात उपस्थित झाला आहे.

# 'विश्वनिर्माता श्री विश्वकर्मा चौक' नामफलकाचे दिमाखात अनावरण

## आ. सत्यजित तांबे यांच्या हस्ते उद्घाटन; बारा बलुतेदारांचे महत्त्व अधोरेखित



छाया - प्रसाद सुतार (शिरसाठ), संगमनेर

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
संगमनेर नगरपरिषद आणि विश्वकर्मा समाज बांधव यांच्या संयुक्त विद्यमाने, नगरपरिषदेच्या बांधकाम विभागांतर्गत विकसित करण्यात आलेल्या 'विश्वनिर्माता श्री विश्वकर्मा चौक' येथील नामफलकाचे अनावरण अत्यंत उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य विश्वकर्मीय समाजाचे राज्य समन्वयक विद्यानंदजी मानकर उपस्थित होते. याप्रसंगी आमदार सत्यजित तांबे, नगराध्यक्षा डॉ. सौ. मैथिलीताई तांबे, माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे, देविदास गोरे यांसह नगरसेवक, नगरसेविका आणि विश्वकर्मा समाजातील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आ. सत्यजित तांबे बोलताना, आमदार त्यांनी बारा बलुतेदारांच्या सामाजिक योगदानावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, आपल्याला जर जगायचे असेल, तर आपण बारा बलुतेदारांशिवाय जगूच शकत नाही. या समाजाचा कष्टाचा आणि कलेचा वारसा अमूल्य आहे. पुढे बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, महापुरुषांच्या कार्याचा आदर्श आणि त्यांची ओळख पुढील पिढीला व्हावी, याच उद्देशातून नगरपालिकेने शहरात ठिकठिकाणी स्मारके आणि चौक सुशोभीकरणाचे काम हाती घेतले आहे.

ज्या विश्वकर्मांने हे संपूर्ण विश्व निर्माण केले, त्यांच्या नावाच्या चौकाचा उद्घाटन सोहळा संपन्न होत असताना, नगरपरिषदेचा ढिसाळ कारभारही समोर आला. एवढ्या मोठ्या सोहळयासाठी नगरपरिषदेला साध्या एका हॅलोजन लाईटचीही सोय करता आली नाही. एका बाजूला स्मारके उभारली जात असताना, उद्घाटनाच्या वेळी किमान प्रकाश व्यवस्था नसावी, हे दुर्दैवी असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली होती. या सोहळ्यानंतर उपस्थित समाज बांधवांनी आनंद व्यक्त केला असून, शहराच्या वैभवात या चौकामुळे मोलाची भर पडल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

# पुणे आंतरराष्ट्रीय कार्टून महोत्सवासाठी अरविंद गाडेकर यांच्या व्यंगचित्राची निवड






संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
०५ मे जागतिक व्यंगचित्रकार दिनाचे औचित्य साधून तिसरा पुणे आंतरराष्ट्रीय कार्टून महोत्सव बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे होत आहे. कार्टूनिस्ट कंबाइन महाराष्ट्र या संस्थेने हे आयोजन केले असून, या महोत्सवात संगमनेर येथील प्रसिद्ध व्यंगचित्रकार अरविंद गाडेकर यांच्या व्यंगचित्राची निवड झाली आहे.

अमेरिका, इराक, इटली, आर्मेनिया, स्विडन, रशिया, ब्राझील, चीन, तुर्की, अर्जेंटिना, ब्राझील सह इतर देशातल्या १५१ व्यंगचित्रकार व ६२ व्यंगचित्रकार भारतातील गोवा, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा, केरळ, काश्मीरसह इतर राज्यातील तसेच महाराष्ट्रातील ६९ व्यंगचित्रकारांनी या मोहात्सवात सहभाग घेतला आहे.

युद्ध, महागाई, पर्यावरण, शिक्षण, सोशल मीडिया या विषयावर व्यंगचित्र मागवली होती.

गाडेकर यांनी १२२०० व्यंगचित्र साकारून ग्लोबल वर्ल्ड रेकॉर्ड स्थापित केले असून, ११००० व्यंगचित्र साकारलेबद्दल 'महाराष्ट्र बुक्स ऑफ रेकॉर्ड' मध्ये या विक्रमाची नोंद झाली आहे. त्यांची व्यंगचित्रे अनेक दैनिक, मासिक, साप्ताहिक, दिवाळी अंकातून प्रसिद्ध होत असून, सोशल मीडियावरील व्यंगचित्रांना विशेष चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# आरक्षण उपवर्गीकरण समितीचा अहवाल सार्वत्रिक करा - माकप



अकोले
(युवावार्ता प्रतिनिधी)-
महाराष्ट्रातील अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाबाबत न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या एक सदस्यीय समितीने १६ मार्च २०२६ रोजी शासनाला आपला अहवाल सादर केला आहे. त्यानंतर १० एप्रिल २०२६ रोजी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली या संदर्भात एक समिती स्थापन करण्यात आली. यानुसार जनतेकडून बदर समितीच्या अहवालावर ३० एप्रिल २०२६ पर्यंत आक्षेप, मते व निवेदने मागविण्यात आली. मात्र ज्या अहवालावर आक्षेप, मते व निवेदने मागविण्यात आली, तो अहवालच सरकारच्या वतीने सार्वत्रिक करण्यात आलेला नाही. जनतेला अहवाल माहीत नसताना त्यावर कुणी आक्षेप कसा घेऊ शकेल? असा प्रश्न या संदर्भात उपस्थित झाला आहे.

उपवर्गीकरणाचा उद्देश अनुसूचित जातींमधील अंतर्गत विषमता कमी करणे हा असेल, तर त्या विषमतेचे स्वरूप व विषमतेची शास्त्रीय वस्तुस्थिती स्पष्ट होणे आवश्यक आहे. व्यापक सर्वेक्षणाच्या आधारे विषमतेचे स्वरूप व वस्तुस्थिती जनतेसमोर मांडल्यानंतरच याबाबतच्या विषमता निर्मूलनाबाबत उपाय सुचविणे व भूमिका घेणे शक्य आहे. अशा प्रकारे व्यापक सर्वेक्षण न करता व समितीने तयार केलेला अहवाल सार्वत्रिक न करता जनतेकडून मते मागवणे, किंवा याबाबत कोणताही निर्णय करणारी कृती करणे, सर्वथा अवैज्ञानिक आहे. अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाचा मुद्दा विषमतेबाबतच्या सर्वेक्षणाशिवाय पुढे नेणे जसे योग्य नाही, तसेच जातीनिहाय जनगणनेच्या शिवाय सुद्धा असे करणे चुकीचे आहे. सरकारने अगोदर जातनिहाय जनगणना पूर्ण करावी व अनुसूचित जाती अंतर्गत विषमतेचे व्यापक सर्वेक्षण करावे, त्यानंतरच याबाबतची मते मागवावी, असे आवाहन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने करत आहोत.

मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली आरक्षण उपवर्गीकरणाबाबत नेमण्यात आलेली समिती ही तीन वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांची समिती आहे. या समितीमध्ये समाजशास्त्रज्ञ, सामाजिक विषयाचे तज्ञ तसेच अनुसूचित जातींचे प्रतिनिधी घेण्यात आलेले नाहीत. यामुळे या अत्यंत गंभीर व संवेदनशील मुद्द्यावर समितीने घेतलेले निर्णय व काढलेले निष्कर्ष चुकू शकतात. सरकारने वर्गीकरणाचे काय व कसे करायचे याबाबतचा निर्णय अगोदरच घेतला असून, केवळ सोपस्कार म्हणून मते व आक्षेप मागितले जात आहेत, असा निष्कर्ष काढण्यास यामुळे जागा निर्माण झाली आहे.

अनुसूचित जाती अंतर्गत एकजुटीवर या संपूर्ण प्रक्रियेचा गंभीर परिणाम होत असून, यामुळे महाराष्ट्राची सामाजिक वीण कलुषित होऊ पाहत आहे. उपवर्गीकरणासारख्या संवेदनशील विषयावर विषमतेबाबतचे व्यापक सर्वेक्षण, विषयाची सखोल विविधांगी माहिती, ठोस आकडेवारी, जातनिहाय जनगणना व या आधारावर व्यापक चर्चा आणि विचार करूनच निर्णय होणे आवश्यक आहे. सरकारने यासाठी वरील सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करून या प्रश्नाबाबत सुरू असलेली अपारदर्शकता तातडीने थांबवावी, व समितीचा अहवाल आणि विषमतेबाबतची आकडेवारी चर्चेसाठी खुली करावी, अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव डॉ. अजित नवले यांनी केली आहे.

# इंदोरीचे माजी सरपंच किसनराव देशमुख यांचे निधन



अकोले
(युवावार्ता प्रतिनिधी)-
इंदुरी गावचे माजी सरपंच किसनराव नागुजी देशमुख यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचे मृत्यूसमयी वय ९२ वर्ष होते. किसनराव देशमुख यांनी गावच्या सरपंच पदासह दूध संस्थेचे चेअरमन पदही भूषवले होते. ते बस्तीराम सारडा यांच्या उंट बिडी उद्योग समूहाचे मॅनेजर होते. त्यांनी इंदुरी येथील सती तारामतीमातेचे मंदिर उभारणी केली आहे.

त्यांचे पश्चात पत्नी, मुले अगस्ती विद्यालयाचे निवृत्त शिक्षक शांताराम देशमुख सर, इंदोरीचे माजी उपसरपंच सुभाष देशमुख, माजी प्राचार्य रमेश देशमुख, तर नातू जलसंपदा अभियंता अक्षय देशमुख, सचिन कृषी सेवा केंद्राचे संचालक सचिन देशमुख, इंजि. आकाश देशमुख हे आहेत. इंदुरी येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

# स्पंदन उपक्रमातून श्री श्री रविशंकर विद्यामंदिर येथे भारतीय प्राचीन कलेचा देखणा आविष्कार



संगमनेर (प्रतिनिधी)
सुमेरु एज्यूकेशन सोसायटी संचलित श्री श्री रविशंकर विद्यामंदिर येथे गुरुवार, दि. ३० एप्रिल २०२६ रोजी स्पंदन या उपक्रमाअंतर्गत भारतीय प्राचीन कला प्रदर्शनाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. आतापर्यंत पाच वर्षांपासून सदर उपक्रम राबवला जात आहे. यंदाचे हे कार्यक्रमाचे सहावे वर्ष आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपल्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची ओळख करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. शेती संस्कृती, पारंपरिक जीवनशैली, चित्रकला, जुने लोकजीवन, घरांचे पारंपरिक प्रकार, मातीची व धातूची भांडी तसेच आपल्या प्राचीन शिक्षण प्रणालीचा अभ्यास करताना आपल्या पूर्वजांची कला शोधा हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यात आला. या प्रदर्शनाचे उद्घाटन सुमेरु एज्युकेशन सोसायटीच्या संस्थापिका स्वाती शाह, सचिव समीर शाह यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका आरती सप्रा, उपमुख्याध्यापिका ज्योर्तिमया चव्हाण तसेच सर्व शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रदर्शनात इयत्ता पहिली ते नववी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. प्रत्येक वर्गासाठी वेगवेगळे विषय निश्चित करण्यात आले होते, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव मिळाला.

इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांनी मातीपासून विविध फळांचे आकर्षक मॉडेल तयार करून मातीची फळे ही साकारली. लहानग्यांच्या या निर्मितींनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांनी शाडू मातीपासून विविध प्रकारच्या भाज्यांचे मॉडेल तयार केले. इयत्ता तिसरीतील विद्यार्थ्यांनी शाडू मातीच्या साहाय्याने विविध आकारांच्या शोभेच्या वस्तू तयार केल्या, ज्यातून त्यांची सर्जनशीलता आणि बारकाई दिसून आली. इयत्ता चौथीतील विद्यार्थ्यांनी शाडू मातीपासून स्वयंपाक घरातील विविध भांडी तयार केली, ज्यामध्ये जुन्या काळातील पारंपरिक भांड्यांचे वास्तवदर्शी रूप साकारण्यात आले.

इयत्ता पाचवीतील विद्यार्थ्यांनी शाडू माती किंवा लाल मातीपासून जलचर प्राण्यांचे सुंदर मॉडेल तयार केले. या माध्यमातून विद्यार्थ्यांनी सागरी जीवनाबद्दलची जाण वाढवली. इयत्ता सहावीतील विद्यार्थ्यांनी शाडू माती, लाल माती आणि चार्ट पेपरचा वापर करून झुंबर, वॉल हँगिंग यांसारख्या सर्जनशील वस्तू तयार केल्या. या कलाकृतींमध्ये विविध डिझाईन्स आणि रंगसंगतीचे आकर्षक दर्शन घडले. इयत्ता सातवीतील विद्यार्थ्यांनी विविध देवी-देवतांचे मुखवटे तयार करून पारंपरिक कलेचा अनोखा आविष्कार सादर केला. या मुखवट्यांमधून भारतीय संस्कृतीतील धार्मिक आणि कलात्मक परंपरा अधोरेखित झाल्या. इयत्ता आठवीतील विद्यार्थ्यांनी वारली पेंटिंग, कार्डबोर्डपासून आदिवासी मुखवटे यांसारख्या कलाकृती सादर करून आदिवासी कलेचा वारसा जपण्याचा प्रयत्न केला. इयत्ता आठवी व नववी च्या विद्यार्थ्यांनी प्राचीन काळातील शोभेच्या वस्तू तयार करून प्राचीन संस्कृतीचे दर्शन घडवले.

या प्रदर्शनास पालकांनीही मोठ्या उत्साहात उपस्थिती लावली. विद्यार्थ्यांनी साकारलेल्या कलाकृती पाहून पालकांनी समाधान व्यक्त केले. मुलांनी इतक्या कमी वयात इतकी सुंदर आणि कल्पक कामे केली आहेत, हे पाहून खूप अभिमान वाटतो, अशी प्रतिक्रिया पालकांनी व्यक्त केली. काही पालकांनी या उपक्रमामुळे मुलांना भारतीय संस्कृतीची ओळख प्रत्यक्ष अनुभवातून मिळत असल्याचे सांगितले, तर काहींनी शाळेच्या या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे मुलांमध्ये सर्जनशीलता वाढते आणि परंपरेबद्दल आदर निर्माण होतो, असेही पालकांनी नमूद केले. संस्थेच्या संस्थापिका स्वाती शाह यांनी उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करताना सांगितले की, स्पंदनसारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान मिळत नाही, तर आपल्या संस्कृतीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळते. भारतीय परंपरा, कला आणि जीवनशैली यांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांनी दाखवलेली सर्जनशीलता आणि सहभाग पाहता हा उपक्रम अधिक व्यापक करण्याचा आमचा मानस आहे.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनामागे कला शिक्षिका सौ. नम्रता म्हाळस यांचे मोलाचे योगदान लाभले. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत त्यांच्या कल्पकतेला योग्य दिशा दिली आणि प्रत्येक कलाकृतीत सर्जनशीलतेचा सुंदर आविष्कार घडवून आणला. त्यांच्या प्रेरणेमुळे विद्यार्थ्यांमध्ये कलेविषयीची आवड अधिक वृद्धिंगत झाली. या प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये कलेबद्दलची आवड वाढली असून, आपल्या संस्कृतीविषयी अभिमानाची भावना निर्माण झाली आहे. स्पंदन हा उपक्रम केवळ कला प्रदर्शन नसून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि परंपरेशी जोडण्यासाठी एक प्रभावी माध्यम ठरत आहे. सदर उपक्रमाला सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह पालकांचेही मोलाचे सहकार्य मिळाले. प्रदर्शन पाहण्यासाठी विद्यार्थी, पालक, याबरोबरच अन्य नागरिकांनीही भेट दिली.

# बारावी निकाल जाहीर

## राज्याचा निकाल ८९.७९%, कोकण विभाग अव्वल




मुंबई
(प्रतिनिधी)-
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेची (एचएससी एक्झाम रिझल्ट २०२६) प्रतीक्षा अखेर संपली आहे. या परीक्षेचा निकाल आज शनिवार, २ मे २०२६ रोजी दुपारी १ वाजता ऑनलाईन पद्धतीने जाहीर होणार आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक मंडळमार्फत घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर होत आहे. राज्य मंडळामार्फत पत्रकार परिषद घेऊन निकाल जाहीर केला जात आहे. राज्य मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी यांनी पत्रकार परिषद घेत १२ वीचा निकालाबाबत माहिती देत आहेत. त्रिगुण कुलकर्णी यांनी दिलेल्या माहितीनुसार राज्याचा निकाल ८९.७९ टक्के निकाल लागला आहे, तर कोकण विभाग ९४.१४ टक्क्यांसह अव्वल आहेत. यावर्षी देखील निकाल घटला आहे, यावरती बोलताना कुलकर्णी म्हणाले, निकाल घटण्यामागे कारण मुख्यत्वेकरून मी मागचा निकाल कम्पेअर करतो, त्यामागे कॉपीमुक्त अभियान चांगल्या प्रकारे राबवलं गेलं असं मला वाटतं. गेल्या वर्षी एकाही कर्मचाऱ्यावरती कारवाई झाली नव्हती, यावेळी १०० जणांवर कारवाई करण्यात आली आहे. गेल्यावर्षी ९१.८८ निकाल होता, यावर्षी २.० टक्क्याने निकाल कमी झाला आहे.

त्रिगुण कुलकर्णी यांनी माहिती देताना सांगितलं की, फेब्रुवारी मार्च बारावी परीक्षा १५३ विषयांचे परीक्षा घेण्यात आली. नऊ विभागीय मंडळातून राज्यात एकूण १४ लाख ५८ हजार एवढ्या मुलांनी परीक्षा दिली. महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ मार्फत घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. राज्याचा निकाल ८९.७९ टक्के इतका लागला आहे. बारावीचा गेल्या वर्षीचा निकाल पाहिला असता ९१.८८ टक्के लागला होता. दरवर्षी प्रमाणं मुलींनी बारावीच्या निकालात बाजी मारली होती. मुलींच्या निकालाची टक्केवारी ९४.५४ टक्के इतकी होती, तर मुलांची उत्तीर्ण होण्याची टक्केवारी ८९.५१ टक्के इतकी होती. तर कॉपी घडू नये यासाठी अनेक जण लक्ष ठेवून होते, परीक्षा अतिशय चांगल्या पद्धतीने घेण्यात आली. एकूण १५ एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. या परीक्षेदरम्यान १०० कर्मचारी निलंबित करण्यात आले आहेत.

यंदाही १२ वीच्या निकालाटी टक्केवारी घटली असली तरी, १२ वीच्या निकालात यंदाही मुलींनीच बाजी मारली आहे. सर्व विभागीय मंडळातून ९३.१५ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या, तर ८६.८० टक्के मुलं उत्तीर्ण झाली. आज दुपारी १ वाजता बोर्डाच्या अधिकृत वेबसाईटवर निकाल पाहता येणार आहे.

आपल्या व्यावसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

दैनिक **युवावार्ता**
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यावसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



भंडारी
विवाह
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# ज्ञानसाधना गुरुकुलचे प्रा. प्रसाद जमदाडे यांना 'संपूर्ण स्वरानंद गौरव' पुरस्कार



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - संपूर्ण स्वरानंद बहुउद्देशीय संस्था आयोजित संपूर्ण स्वरानंद संगीत महोत्सवाच्या निमित्ताने केडगाव स्थित ज्ञानसाधना गुरुकुलच्या माध्यमातून ज्ञानदान करणाऱ्या प्रा. प्रसाद जमदाडे यांना संपूर्ण स्वरानंद गौरव पुरस्काराने संजय जाधव याच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. प्रसाद जमदाडे यांनी शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात भरीव कामगिरी केली असून त्यांच्या गुरुकुल शिक्षण पद्धतीने अनेक विद्यार्थी घडत आहेत. त्यांनी अनेक गोरगरीब विद्यार्थ्यांचे पालकत्व घेऊन त्यांना मोफत शिक्षणाची सोय केली आहे. ज्ञानसाधना गुरुकुल मध्ये ७५० विद्यार्थी शिक्षण घेत असून प्रसाद जमदाडे स्वतः विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी कार्य करीत आहेत. संस्थेचे अध्यक्ष महेश खोपटीकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी जमदाडे यांचे अभिनंदन केले. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने प्रसाद जमदाडे यांचे हार्दिक अभिनंदन.

# चिकणी गावाला क्रीडांगण मिळावे यासाठी आनंद वर्पे यांचे आमरण उपोषण सुरू



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - गावातील मुलांना मैदानी खेळ खेळण्यासाठी ग्राम पातळीवर चांगली क्रीडांगण असावी या मागणीसाठी संगमनेर तालुक्यातील चिकणी येथील ग्रामस्थांनी उपविभागीय अधिकारी, गटविकास अधिकारी व तहसीलदार यांना पत्र देऊन सरकारी गट नंबर ४ मधील २ हेक्टर क्षेत्राची मागणी केली होती मात्र ग्रामपंचायतीने या क्षेत्रावरील अतिक्रमणे काढून क्रीडांगणाची जागा मोकळी करून देण्यासाठी दिलेली एक महिन्याची मुदत संपूनही ही कारवाई झाली नाही त्यामुळे संगमनेर तालुका किसान ( शेतकरी शेतमजूर) कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष आनंद निवृत्ती वर्पे व वैभव रावसाहेब वर्पे यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवार रोजी चिकणी ग्रामपंचायत कार्यालयासमोर प्रशासनाच्या विरोधात अमरण उपोषण सुरू केले आहे.

याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात वर्पे यांनी म्हटले आहे की, संगमनेर तालुक्यातील चिकणी गावठाण शिवारात गावातील मुलांना खेळण्यासाठी सुशोभित क्रीडांगण असावे अशी ग्रामस्थांची इच्छा आहे. त्यासाठी ग्रामपंचायतीकडे महाराष्ट्र शासनाच्या मालकीचा सरकारी गट नंबर ४ मधील जागेची मागणी करण्यात आली होती. या सरकारी जागेवर मोठ्या प्रमाणात अनधिकृत अतिक्रमणे करण्यात आली आहे. ही अतिक्रमण काढण्याची विनंती ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीकडे तसेच तहसीलदार व गट विकास अधिकारी यांच्याकडे करीत वेळोवेळी पाठपुरावा केलेला आहे. तसेच सदर गट नंबरची मोजणी देखील झालेली आहे मात्र अद्यापही सदर अतिक्रमण न काढल्याने क्रीडांगणाचे काम सुरू होत नाही.

याबाबत आमरण उपोषणाचा इशारा दिल्यानंतर ग्रामपंचायतीने २५ मार्च २०२६ रोजी आनंद वर्पे व ज्ञानेश्वर वर्पे यांना पत्र देऊन आपल्या मागणीप्रमाणे मोजणी फी भरली आहे तसेच क्रीडांगणासाठी २ हेक्टर क्षेत्राची मागणी ग्रामपंचायतीने तहसील कार्यालय मार्फत केली आहे. सदर प्रस्तावाची पोहोच घेतली आहे तरी १ महिन्यामध्ये पुढील सर्व पूर्तता करण्यात येईल असे आश्वासन देत सदरचे उपोषण स्थगित करण्याची विनंती केली होती मात्र तो कालावधी उलटूनही परिस्थितीत जैसे थे असल्याने स्थानिक प्रशासनाकडून अतिक्रमण काढून क्रीडांगणासाठी जागा मोकळी करून द्यावी अशी मागणी निवेदनाद्वारे गट विकास अधिकारी यांना केली आहे.

# डिजिटल स्वाक्षरीत फेरफार
## कुंभमेळा प्राधिकरणात मोठा घोटाळा

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा नाशिकचे विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या बनावट स्वाक्षरीने ७० कोटी रुपयांची कार्यारंभ आदेश वर्क ऑर्डर देऊन फसवणूक करण्याचा प्रकार समोर आला असुन या प्रकरणी पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. डॉ. गेडाम यांच्या अधिकृत डिजिटल स्वाक्षरीत 'Praveen' असे स्पेलिंग असताना बनावट पत्रांवर 'Pravin' असे स्पेलिंग होते. ही बाब डॉ. गेडाम यांच्या नजरेने हेरली व ही सही आपली नसल्याचे त्यांच्या लक्षात आले आल्याने भांडाफोड झाला.

**डॉ. गेडाम यांचा चाणक्षपणा**

**कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा विभागीय महसूल आयुक्त डॉ. प्रविण गेडाम यांच्या स्वाक्षरीत बदल करून होणारा आर्थिक घोटाळा त्यांच्या चाणक्षतेने उघड झाला. व संबंधीतावर कायदेशीर कारवाई करण्यात आली.**

कुंभमेळ्यानिमित्त सीसीटीव्ही सर्वेक्षण बसविणे, कार्यान्वित करणे व देखभालीच्या कामांच्या कार्यादेशावर नाशिकचे विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांची बनावट डिजिटल स्वाक्षरी वापरुन त्र्यंबकेश्वर-कुंभमेळा प्राधिकरणाच्या नावाने तब्बल ३५ कोटींच्या २ कामांची थेट वर्क ऑर्डर काढण्यात आली होती. हा कार्यादेश इनोव्हेटिव्ह इंटेलिजन्स एआय ऑटोमेशन सोल्युशन्स एजन्सी, ठाणे' 'या संस्थेच्या नावे तयार करण्यात आला होता. याप्रकरणी नाशिक रोड पोलिसांत अज्ञात संशयिता विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. डॉ. गेडाम यांचे स्वीय सहायक विजय गोरख सोनवणे यांनी नाशिकरोड पोलिसांत फिर्याद दिली आहे. २८ एप्रिल रोजी नीळकंठ शेवाळे नावाचा व्यक्ती नाशिक विभागीय आयुक्त कार्यालयात आला. त्याने दोन संशयास्पद पत्रांच्या वैधतेबाबत विचारणा केली. ही पत्रे त्यांना स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नांदेडचे गजानन पाटील चव्हाण यांनी दिल्याचे त्यांनी सांगितले.

INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग १० जागा
टेली कॉलिंग १० जागा
सेल्स ऑफिसर ०५ जागा
ड्रायव्हर ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता -
श्री स्वामी समर्थ एजन्सी,
स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क -
7030334486
7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✻ कर्ज रक्कम वाढ । ✻ कर्ज व्याजदर कमी । ✻ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

# संगमनेर बार असोसिएशन अध्यक्षपदी ॲड. देशमुख तर उपाध्यक्षपदी ॲड. रोहम





युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुका बार असोसिएशन (वकील संघटना) अध्यक्षपदी ॲड. मीनल गुलाबराव देशमुख या १५१ मतांच्या मोठ्या फरकाने विजयी झाल्या असून उपाध्यक्षपदी ॲड. किरण सुधाकर रोहम यांची निवड झाली आहे.

संगमनेर तालुका बार असोसिएशनच्या निवडणुकीमध्ये ॲड. मीनल देशमुख- कोते यांना २५५ मते मिळाली विरोधी उमेदवार जनार्दन वाळूज यांचा त्यांनी १५१ मतांनी पराजय केला तर उपाध्यक्षपदी ॲड. किरण सुधाकर रोहम यांची निवड झाली. महिला उपाध्यक्षपदी ॲड. वंदना दत्तू दिघे वाबळे, सचिव पदी ॲड. अमोल कारभारी घुले, सहसचिव म्हणून ॲड. सुशांत सोमनाथ वाळे, खजिनदार ॲड. बबनराव गणपत नाईकवाडी, तर सदस्य पदी ॲड. अरुण गायकवाड, ॲड. मेघाताई तापडिया, ॲड. सना पठाण, ॲड. ऋषिकेश वाणी , ॲड. प्रतीक दातीर यांची निवड झाली आहे.

नवीन पदाधिकाऱ्यांच्या या निवडीबद्दल महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते तथा संगमनेर वकील संघटनेचे सदस्य लोकनेते बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ. सुधीर तांबे, आ. सत्यजित तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात, ॲड. सुहास आहेर, ॲड. प्रदीप मालपाणी, यांच्यासह वकील संघटनेच्या सर्व आजी-माजी पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
डायलिसीस | सुसज्ज ऑपरेशन थिएटर | सीटी स्कॅन
सोनोग्राफी, २डी इको, एक्स रे | अत्याधुनिक लॅब | अत्याधुनिक आयसीयु
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13




कुटे हॉस्पिटल
ॲंड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25